# मोगऱ्याचीं फुलें

## गुच्छ

२

गं. रा. मोगरे.

पुस्तकें मुंबईत विविधज्ञानविस्तार ऑफिसांत मिळतील.

# मोगऱ्याचीं फुलें

अर्थात्

## गंगाधर रामचंद्र मोगरे

याची कविता.

## गुच्छ दुसरा.

मुंबईंत,
जावजी दादाजी यांच्या "निर्णयसागर" छापखान्यांत छापिली.

जुलै १९०८.

प्रकाशक—नाडकर्णी आणि मंडळी.

[ किंमत ६ आणे. ]

[ प्रकाशकांनीं सर्व हक्क स्वाधीन ठेविले आहेत. ]

# अनुक्रमणिका.


| | |
|---|---|
| | पृष्ठ. |
| कन्यादान. | १ |
| बुद्धजन्म. | ४ |
| माझें झाड. | १५ |
| जगद्देवचरित्र. | १८ |
| हिंदुस्थानावर शिकंदराची स्वारी. | २७ |
| सह्याद्रि. | ४५ |
| दुःखिताचें स्वसमाधान | ४८ |
| मधमाशी. | ५० |
| गृहस्थाश्रम. | ५२ |
| विजयिनीविजयाष्टक. | ६२ |

# महादेव रामकृष्ण मोरमकर.



जन्म—६ जून १८८१.

मृत्यु—४ मे १९०४.

# समर्पण.

'स्वशिरीं विस्ताराचा घेउनियां भार आपला बाळ
सेवेंतची मराठी भाषेच्या नित्य घालवो काळ.' १

गुरुजनसंकल्पा ह्या उत्साहाची तुझ्या मिळे जोड;
पुरवी कोण मनाचें वडिलांच्या सत्सुताविना कोड? २

वडिलांच्या आज्ञेनें तूं ह्या मार्गास लागशी जेव्हां,
आले विस्ताराला सुदिन ह्मणति आप्त मित्रजन तेव्हां. ३

स्वीकृत कार्यीं बघुनी तत्परता तव सदा मजहि वाटे
विविधज्ञानतरूला फुटतिल आतां नवे नवे फांटे. ४

नाहीं परंतु नाहीं दैवाला हा प्रकार आवडला!
येउनि सर्व मनोरथ–सिद्धिपथीं मृत्यु आडवा पडला! ५

नसतां ध्यानीं स्वप्नीं उद्भवली जी अकाल–वादलिका,
गेली सर्वांच्याही आशेची तींत चिरडुनी कलिका! ६

हेतु पित्याचा, इच्छा मातेची, तो तुझाहि उत्साह,
कालानलीं अकस्मात् पडुनी हीं सर्व पावलीं दाह! ७

गेलीं माधवराया! गेलीं हीं त्वत्समागमें सगळीं!
ती नेववे न ह्मणुनी काळ तुझी स्मृतिच तेवढी वगळी! ८

तीच स्मृति ह्या हृदयीं वसुनि सदा तव सुहास्यवदनातें
आणुनि समोर माझ्या ह्मणते,–विसरूं नका नका मातें! ९

माझ्या चिमण्या मित्रा! ह्मणुनि फुलांचा लहानसा झेला
त्या स्मृतिलाच तुझ्या मी अर्पण सप्रेम साश्रु हा केला! १०

गंगाधर रामचंद्र मोगरे.

# प्रस्तावना

'मोगऱ्याच्या फुलां'चा प्रथम गुच्छ १९०२ मध्यें प्रसिद्ध झाला. त्यांत पुढील सहा काव्यकुसुमें गुंफिलीं होतीं:—१ विष्णु कृष्ण चिपळूणकर; २ महाराष्ट्रजनविलाप, अथवा कोल्हापुरच्या चौथ्या शिवाजी महाराजांचा मृत्यु; ३ रिपनवियोग; ४ हेन्री फॉसेट; ५ सती; व ६ मराठी ग्रंथकारांस प्रार्थना.

या प्रथम गुच्छाबद्दल रसज्ञ जनांनीं अत्यंत अनुकूल अभिप्राय प्रकट केले. त्यांतील कांहीं वेंचे येथें देतों:—

मोगरे यांची कविताशक्ति चांगली आहे. भाषा साधी परंतु गंभीर, विचार उदात्त, कल्पना चांगल्या, वर्णन मनोहर व शब्दांची निवड तारतम्यानें केलेली असते. (शाळापत्रक). ह्यांच्या कांहीं कविता वाचतांना आपण मोरोपंताचें उत्तम काव्य वाचीत आहों कीं काय असा भ्रम पडतो. (इंदुप्रकाश). यांच्या कविता खरोखरच मोगऱ्याच्या फुलांप्रमाणें आनंददायक असतात असें ह्मटलें तर अतिशयोक्ति होणार नाहीं. (सुधारक). या मोगऱ्यांच्या फुलांत सामान्य मोगऱ्याच्या फुलांचें स्वारस्य असून, त्या स्वारस्याचा अल्पकालस्थायित्व हा दोष मात्र यांत नाहीं. (ग्रंथमाला). आधुनिक मराठी भाषा कवीच्या हातीं किती सुंदर तऱ्हेनें सजूं शकते व तिच्या योगानें—"रडे ग्रावा तैसें हृदय अशनीनेंच फुटतें—" असें करतां येतें कीं नाहीं, हें या पुस्तकावरून उत्तम प्रकारें दिसणार आहे. (करमणूक). सगळ्या कविता उत्तम आहेत.···हें पुस्तक उत्तम वाचनीय आणि उत्तम संग्राह्य आहे. (बालबोध).

याप्रमाणें या प्रथम गुच्छाचें अभिज्ञ लोकांनीं जरी स्तुतिस्तोत्र गाइलें तरी एक हजारांची प्रथमावृत्ति अझून संपलेली नाहीं! लोकाश्रयाचा हा प्रकार निराशाजनक आहे. तरी कृत संकल्पास स्मरून, उशीरानें कां होईना, हा दुसरा गुच्छ रसिक जनांस सादर अर्पण करण्यांत येत आहे. यापासून मराठी वाङ्मयांत

एका सुंदर पुस्तकाची भर पडली आणि आपल्यास एका चांगल्या पुस्तकाची जोड लाधली, असें प्रत्येक वाचकास वाटल्यावांचून राहणार नाहीं.

या गुच्छांतील दोन तीन अपुरीं प्रकरणें वाचून, तीं पुरीं न झाल्याबद्दल मराठी कवितेच्या रसज्ञ भक्तांस निःसंशय चुटपुट लागून राहील. "आर्यभूपर्यटण" या काव्यामध्यें हिंदुस्थानांतील बहुतेक प्रसिद्ध आणि ऐतिहासिक स्थलांचें वर्णन यावयाचें होतें. परंतु कवीच्या हातून तें पुरें झालें नाहीं. आणि लिहिलेल्या भागापैकींही बराच भाग कीटकांच्या भक्ष्यस्थानीं पडून नष्ट झाला. 'जगद्देवचरित्रा'चा प्रकाशित भाग त्या काव्याचा केवळ विषयप्रवेश आहे! गंगाधरपंतांनीं Sir Edwin Arnold यांच्या Light of Asia या काव्याचें मराठी रूपांतर करण्यास सुरवात केली होती. परंतु 'बुद्धजन्मा'पलीकडे त्याची मजल गेली नाहीं! यास कारण केवळ कवीची शरीरप्रकृति. देवानें आरोग्य दिलें तर अपुरीं काव्यें पुरीं करून, त्यांत आणखी बरीच इष्ट भर घालण्याचा त्यांचा संकल्प आहे. देवदयेनें हा त्यांचा संकल्प सिद्धीस जावो असें आमच्याप्रमाणें त्यांच्या कवितेच्या प्रत्येक सहृदय वाचकास वाटल्यावांचून राहणार नाहीं.

या गुच्छांतील 'दुःखिताचें स्वसमाधान' ही कविता बालबोधमधून घेतली आहे. बाकी सर्व कविता विविधज्ञानविस्तारांत प्रसिद्ध झाल्या आहेत.

रा० मोगरे यांची आणखी किती तरी कविता अझून पुस्तकरूपानें प्रसिद्ध व्हावयाची आहे. आणि ती प्रसिद्ध होण्याचा सुयोग लौकरच येईल अशी आशा आहे.

**प्रकाशक.**

# मोगऱ्याचीं फुलें.

## गुच्छ २.

### कन्यादान.

श्रीमन्महाराज शिवाजीराव होळकर, संस्थान इंदूर,

यांच्या सेवेसीं—

वर्षें लक्ष जरी रचीत बसली स्तोत्रें तयांचीं सदा
ज्यांच्या मुक्त ऋणांतुनी न सहसा होऊं शके शारदा,
ते श्रीविक्रम मुंज भोज विलया जातांच कोणी नुरे
भर्ता, यास्तव जी निरंतर मनीं इंदूरपाळा झुरे; १
विद्वद्भृंगतती सदा विचरती पूर्वी जिच्या भोंवती,
दारोदार तिचे पितेच तिजला घेवोनियां धांवती;
ह्या वैराग्ययुगीं तथापि न मिळे कोणीच भोक्ता जिला,
भावी आटपला ह्मणून सगळा संसार जी आपला; २
पावे दीनदशा अशी विधिवशें ही स्वात्मजा पाहुनी
लज्जेनें मुख दाखवूं न शकती जीचे पितेही जनीं;
ऐशा ह्या कवितावधूस पदरीं घ्याया शिवाजी नृपा!
आहां योग्य तुह्मी ह्मणून तुमची याचीतसें ही कृपा. ३

राया! थोर तुह्मां रसज्ञ ह्मणतां मिथ्या नसे ती स्तुती,
ह्याची साक्ष जनांस आज तुमच्या देती उदारा कृती.
आहे ही रसिकप्रिया रसवती कन्या कवींची किती,
द्याया बाणकृती नसेल चुकली ह्याची तुह्मां माहिती. ४

मानी माळवभूस ज्या रसिकता माहेरची आपलें,
जीचें आज तुह्मांस राज्यपदही आहे प्रभूनें दिलें,
पूर्वीं देह तिथेंच केवळ हिचा भोजाश्रयें वाढला,
लागे फार हिलाहि यास्तव सदा त्या भूमिकेचा लळा. ५

हीचें जन्म जरी अनेक जनकांपासून राया असे,
झाला हीस न गर्भवास; ह्मणुनी ही जारजाता नसे;
हीला आजवरी असंख्य रसिकीं आहे जरी भोगिलें,
कौमारव्रत आपलें तरि हिनें नाहींच भंगू दिलें. ६

जो जो आढळला रसज्ञ पडली भावें तयाच्या गळां,
ही निस्सीम पतिव्रता न मळतां राहे तरी निर्मळा;
झालीं जन्मुनियां जगांत हिजला वर्षें हजारों तरी,
वाटे षोडशवार्षिकीच अझुनी ही राहिली सुंदरी! ७

कांहीं लोक हिला विकून करिते निर्वाहही जाहले,
कन्यारत्न तरी अमोलिक जगीं अद्यापि हें राहिलें;
रत्नें सर्व दुजीं सुरम्य दिसती बाहेरुनी मात्र तीं,
अंतर्बाह्य सुरम्यता न वरितां येई हिची त्यांप्रती. ८

नाना वस्तु जगीं रसाळ दुसऱ्या आहेत राया! तरी
सर्वांहून हिचीच फार रसिकीं वाखाणिली माधुरी;
येतो वीट विशेष पान करितां अन्यां रसांचें जनां,
जावें सेवित हीस तों अधिकची उल्हास वाटे मना! ९
ऐशी आज तुह्मांस ही कविसुता आली वराया स्वयें,
अंगीकार करा! स्वयंवरवधू अव्हेरितां ही नये!
आला सुंदर योग फार दिवशीं हा थोर भाग्यें, तरी
वायां घालवितां न, ध्याच पदरीं ही एवढी नोवरी! १०
पत्नी एक घरीं असून दुसरी ही आदरावी, तरी
होतें कारण तें कुटुंबकलहा; ही गोष्ट आहे खरी.
ज्याचें प्रेम परी हिच्यावरि खरें इंदूरपाळा जडे,
त्याच्या सर्व सुहृज्जनांसहि-मनापासून ही आवडे. ११
शंका यास्तव सर्व दूर करुनी भोजाप्रमाणें धरा
झांकाया स्वयशःपटें नरवरा! स्वीकार हीचा करा!
आहे हीच विनंति; सार्थक हिचें राया शिवाजी घडो!
कन्यादानविधानपुण्य पदरीं हें माझियाही पडो! १२

# बुद्धजन्म.

[डा० एड्विन् आर्नोल्ड साहेबांच्या "Light of Asia" नामक ग्रंथावरून.]

हरोनि अज्ञानघनांधकारा
संतोषवाया नरलोक सारा
ज्ञानार्कची जो उदयास आला
मी वंदितों त्या मुनि गौतमाला. १

त्रेतीं उत्तरकोशलाप्रति जशी स्वायंभुची संतती
पाळी शाक्यमही तशी कलियुगीं **शुद्धोदन** क्ष्मापती;
**माया** तद्दयिता पतिव्रतरता शृंगारसारापगा;
वाटे मूर्तिमती रती प्रकटली ती भूषवाया जगा ! २

पुत्रप्रेम जरी नृपास नव्हतें अद्यापि ठावें, तरी
वाटे सर्व जनां प्रजावन करी हा राव पुत्रापरी;
होती भावित बालकाविण जरी संसार सारा उणा
**माया** ही म्हणवून लोकजननी घेई तरी आपणा. ३

व्हावा पुत्र अशी अखंड धरुनी भूपें मनीं कामना
केले याग बहु, द्विजांस दिधली लक्षावधी दक्षणा;
नाना आचरुनी व्रतें, करुनियां फेऱ्या वडा पिंपळा,
राज्ञीही सुकुमार काय शिणवी रात्रंदिनीं आपला. ४

होतीं विश्रुत दैवतें हरिहरब्रह्मादि जीं जीं जनीं,
नाहीं एकहि त्यांतलें उरविलें आराधिल्यावांचुनी;
स्नानें सर्व पुराणसंमत महापुण्योदकीं सारिलीं,
क्षेत्रीं ब्राह्मणभोजनें करवुनी दानें असंख्यें दिलीं. ५

ऐसा चालत हा प्रकार असतां, ह्या दानधर्मामुळें
किंवा तें निज पूर्वकर्मचि ह्मणा ह्या भूमिपाला फळे;
ऐका काय अपूर्व एक समयीं झाला चमत्कार तो—
आहे मूळ कथानकांत लिहिला तैसाच मी सांगतों. ६

करोनि रात्रीं रमणीय केली
स्वकांतसंगें असतां निजेली,
स्वप्नांत शुद्धोदनराज-जाया
पाहे चमत्कार अपूर्व माया. ७

कीं यत्प्रभा अरुणमौक्तिक राग वीते
ऐसें जया किरणषट्क विभूषवीते,
होती तडिन्निभचि दंत सहाहि ज्याचे,
क्षीरापरी विमल होय यदंग साचें; ८

तारा असा वारणरूपधारी
मारोनियां व्योमपथें भरारी,
शिरोनियां दक्षिणपार्श्वमार्गें
स्वगर्भकोशीं स्थिर होय वेगें. ९

जागी सती सत्वर होय, हर्षें
भरोनि गेला उरहि प्रकर्षें;

दुष्प्राप्य जें मानव-सूस आहे
**माया** अशा दिव्य सुखास लाहे. १०

सहस्ररश्मी उदया न आला
तोंचि स्वयें नासुनियां तमाला
दिङ्मंडळा भेदुनि हर्षदीप्ती
अर्धाधिक क्ष्मातल दीपवी ती; ११

थरारलीं चंड शिरें गिरींचीं,
स्थिरावल्या क्षुब्ध समुद्रवीची;
ज्या सूर्यरश्मीच विकासवीती
ऐशाहि नानाविध पुष्पजाती, १२

मध्यान्हकालावसरभ्रमातें
पावोनि गेल्या फुलुनी नितांतें;
करोनि संचार दरींत जैशी
चंडार्कभा घोर तमास नाशी, १३

नृपांगना हर्षरविप्रकाश
तसाच फोडूनि निराळदेश,
भेदोनियां सप्तरसातलांला
व्यापीत गेला जडजंगमांला. १४

अशा महानंदभरांत वाणी
नभोदरापासुनि लोककर्णीं
प्रवेशली येउनियां अशी कीं,
"आला उठा गौतम बुद्ध लोकीं ! १५

“असाल मेले अथवा जिवंत
“असोनि होणार असे यदंत,
“ते होउनी सावध आयका या,
“आला तुह्मां बुद्ध समुद्धराया !” १६

आकाशवाणी परिसोनियां ती
मावे न हर्षोत्कर लोकचित्तीं.
असो. सुखाची रजनी अशी ती
जावोनि आला उदया गभस्ती. १७

दिक्सुंदरीचीं वदनारविंदें
विकासलीं रव्युदयीं प्रमोदें;
अपूर्व सौख्यप्रद गार वारा
घालीतसे अस्थिर येरझारा. १८

प्रसन्नता सर्व जगास आली;
जळीं स्थळीं शांति भरोनि गेली;
त्यजोनि शय्या जनही प्रभातीं
कर्तव्यकर्मांत निमग्न होती. १९

उठोनि शुद्धोदनराव पाहे,
तों स्वप्रिया हर्षभरांत आहे;
ह्मणे मनुष्येश्वर–“चारुशीले !
प्रसन्न कां त्वन्मन आज झालें ?” २०

मंदस्मितास्यें नरपाळकंठीं
प्रेमें मिठी मारुनि कंबुकंठी

सती पतीला मुदितांतरंगें
स्वप्नांतलें वृत्त समस्त सांगे. २१

नृपाळही पावुनियां सुखाला
ज्योतिर्विदां बोलविता जहाला;
निवेदितां सर्वहि वृत्त त्यांतें,
स्वप्नार्थ त्यांनीं कथिला नृपातें. २२

'शुभप्रद स्वप्न असे नृपा हें;–
'कीं कर्कलग्नस्थित भानु आहे;
'विद्वज्जनां वंद्य अशा कुमारा
'तुझी नरेंद्रा प्रसवेल दारा. २३

'हरोनि अज्ञानघनांधकारा
'तारील तो मानवलोक सारा;
'किंवा जरी राज्य करूं म्हणेल,
'तरी सुखें शासिल भूमिगोल.' २४

ऐकोनियां ही गणकोक्ति झाला
अपार आनंद नराधिपाला;
समर्पुनी अंबररत्नराशी
वंदोनियां बोळविलें तयांशी. २५

असो; अशी गर्भवती सती ते
होवोनि, जातां नवमास तीतें,
एके दिनीं स्वीय सखींसमेत
फिरोनि येतां गृहवाटिकेंत, २६

श्रमोनि शुद्धोदनराजजाया
निरातपस्थान विलोकुनीयां
विश्रांति घ्यायास्तव जाय **माया**
पलाशवृक्षाजवळी बसाया. २७

विशाल तो वृक्ष नभोपथाला
भेदोनि उंचावत फार गेला;
शिरीं तयाच्या नवपल्लवांचा
संभारही होय किरीट साचा; २८

पुष्पें न तीं केवळ दिव्य रत्नें,
स्थिरावलीं त्या मुकुटीं क्रमानें;
निर्जीव तो वृक्षहि मान खालीं
येतां सतीला निरखोनि घाली. २९

भविष्य जाणूनचि काय वाटे,
स्वकीय शाखा लववूनि नेटें
सतीसभोंतीं तरुही उभारी
महाजवें मंडप तोषकारी! ३०

नानापरींचीं सुकुमार पुष्पें
तत्काळ गोळा करुनी अमूपें,
त्या कोमलांगीकरितां धरेनें
शय्या फुलांची रचिली त्वरेनें! ३१

करावया स्नान तिला असावें
समीप शुद्धोदक याच भावें,

झराहि तेथें विमलोदकाचा
निर्मीतसे नायक पर्वतांचा ! ३२

त्या वाटिकेमाजि अशा प्रसंगीं
प्रसन्नचित्तें असतां शुभांगी,
सुलक्षणें बत्तिस पूर्ण ज्याला
**माया** अशा त्या प्रसवे सुताला. ३३

सद्वृत्त तें जाय नृपाळकर्णीं;
आनंद त्याचा मग कोण वर्णी !
सुखासनीं बैसवुनी प्रियेला
आणावया आपण राव गेला. ३४

पुत्रासह क्ष्माधिपधर्मपत्नी
आरूढली सत्वर दिव्य यानीं.
आश्चर्य वर्ते परि एक तेथें,
तें सांगणें होय अवश्य येथें. ३५

जन्मास ये **बुद्ध** मनुष्यलोकीं–
वृंदारकां हें कळतांच नाकीं,
घेवोनि संगें परिवार हर्षें
आले तिथें दिक्पति गुप्तवेषें. ३६

महाप्रतापी त्रिदिवेशाही ते
कळों न देतां इतरां जनांतें
आंदोलिकादंड धरोनि हातीं
त्या मायलेकां सदनांत नेती. ३७

हें देवकृत्य क्षितिपा न ठावें,
तथापि तो विस्मय फार पावे;
म्हणोनि बोलावुनियां नृपाळें
ज्योतिर्विदां, जातक वर्तवीलें. ३८

गणक म्हणति—'राज्य क्ष्मातलाचें कराया
'उचित खचित आहे हा तुझा पुत्र राया!
'दशशत शरदीं जे जन्मती चक्रवर्ती
'गणविल सुत तूझा त्यांमधें स्वीय मूर्ती. ३९

'मणि, रथ, गज, वाजी, नीतिशास्त्रज्ञ मंत्री,
'प्रबलदलविनेता, कामिनी चारुगात्री,
'मिळति न इतरां हीं सर्वथा जीं प्रयत्नें
'वरिल सुत तुझा तीं सातही दिव्य रत्नें.' ४०

परिसुनि गणकांचे बोल पृथ्वीश्वरानें
बहु धनवसनीं त्यां पूजिलें आदरानें;
धड धड धड वाजूं लागलीं भेरिवाद्यें,
गगन दुमदुमोनी जाय त्यांच्या निनादें. ४१

हरिखुनि नरनारीवृंद गंधोदकांनीं
करुनि सकल ओली टाकिती राजधानी;
उभविति जन सारे द्वारदेशीं ध्वजांला.
विलसति तरुशीर्षीं तोरणांच्याहि माला. ४२

लक्षावधी ब्राह्मण दक्षिणार्थी
एकापुढें धांवति एक पंथीं;

सुवासिनी मंगल दीप हातीं
घेऊनियां राजगृहास जाती. ४३

होती बहू बंधविमुक्त बंदी;[1]
गाती नृपाचें यश फार बंदी;[2]
वारांगनाही बहु दाखवीती
मनोहरा नर्तनगानरीती. ४४

रस्तोरस्तीं खेळ खेळोनि नाना
झाले खेळी रंजवीते जनांना;
कोठें मार्गी गारुडी हिंडताती,
हातीं त्यांच्या लोंबती सर्पजाती. ४५

शाटिका भरजरी जरतारी
लेवुनी विनटतां नटनारी,
होय नूपुररव प्रतिपादीं;
रंगती कितिक त्याच निनादीं! ४६

घेउनी बहुरुपी बहु सोंगें
हिंडतां जनहि धांवति मागें;
लोभ दावुनि कुठें मतिमंदा
लाविती सहज मांत्रिक नादा. ४७

कोल्हाट्यांचे चालती खेळ कोठें,
कोणा वाटे तेंच आश्चर्य मोटें;

१ कैदी लोक. २ भाट.

कोठें कोणी घेउनी सोबत्यांना
स्वांगें खेळों लागले खेळ नाना. ४८

दाटींत त्या जपुनि चालवुनी स्वहस्तीं
वांटीत साखरपुडे नृपदास येती;
वाद्यें चतुर्विध तशांतचि वाजताती,
'घ्या घ्या', 'पुरे' रवहि लोपुनि त्यांत जाती. ४९

ऐसा महोत्साह पुरींत होतां,
देशांतरीं ती पसरून वार्ता
अनेक देशांतिल लोक येती
रायाकडे होउनि हृष्ट चित्तीं. ५०

अमूल्य हेमांबररत्नराशी
समर्पुनीयां नरनायकाशीं,
वंदोनियां तच्चरणारविंदा
सामंतही दर्शविती प्रमोदा. ५१

जे जे जगीं दुर्मिळ ह्या पदार्थ,
ते ते प्रयत्नें मिळवून सार्थ
आणून देती मनुजाधिपाला;
कीं हर्ष त्यांनाहि अपार झाला! ५२

हिरण्यपात्रांत भरोनि कोणी
नाना मनोवेधक बाळलेणीं

१. मांडलिक राजे. २. व्यापारी.

रायापुढें ठेवुनियां, तयाला
अत्यादरें सांगति घ्यावयाला. ५३

घेवोनि कोणी चिमण्या मुलांचीं
ये भूषणेंही मणिकांचनाचीं;
कोणी जरीच्या चिमण्याच शाली
देती नृपा आणुनि भाग्यशाली. ५४

अस्तास जाय इतक्यांत मयूखमाली;
धुंडीत जाति घरटीं खग आपलालीं;
आल्या घरास परतून चरोनि गाई;
व्यापूनि तत्पदरजें पुर सर्व जाई. ५५

निशामुखीं दीपक जागजागीं
प्रकाशले चित्रविचित्र रंगी;
घरोघरीं सुस्वर पौरकन्या
आलापिती दीपकराग धन्या. ५६

# "माझें झाड."

[ माझें ह्मटलें ह्मणजे त्यास किंमत नसते; तें अमोल आहे. ]

## आर्या.

जा जा लांकुडतोड्या ! करिसी तूं काय कर्म बापा हें !
तोडूं नको नको तें आवडतें झाड आमचें आहे ! १
दे ती कुऱ्हाड टाकुनि ! तुज मी वाहून सांगतों आण—
घाव न ह्या झाडावर माझ्या मर्मीं बसेल तो बाण ! २
फांदी काय तयाचें पानहि तोडावया पुढें हात
ज्याचा सरेल त्याचा ह्या दंडानें करीन मी घात ! ३
तपतां तापें बसलों शीतळ छायेंत आजवरि ज्याच्या
झिजवीन देह मी हा माझा संरक्षणीं सदा त्याच्या. ४
लावियलें हें माझ्या आजानें झाड आमच्या दारीं;
वृद्धहि असुनी होता ह्याची तो घेत काळजी भारी. ५
सांगूं काय जरेनें ती जरि अत्यंत वांकली होती,
आजी माझी घाली तोय सदा ह्यास आपल्या हातीं. ६
येतां ह्याच्याजवळी वळवावें हांकुनी तिनें गूर;
हा हू करोनि कष्टें पळवावीं हूड पाखरें दूर. ७
नव्हतास तूं तयीं, मज आहे ती ठावकी कथा सारी;
साक्षहि तुला हवी तर माझे देतील सर्व शेजारी. ८

मधुर फळांची ह्याच्या कोणी घेऊनि जे चवी जाती,
ते सर्व लोक ह्याच्या महिम्याला नित्य आदरें गाती. ९
न करि सुधारस त्यांच्या मधुर रसाची बरोबरी न करी;
जा कोठेंहि विचारीं—सगळे ह्मणतील गोष्ट हीच खरी. १०
आहे जुनाट तरु हा, खोल किती तीं पहा मुळें गेलीं;
असतील मार्ग न मिळे ह्मणुनि पुढें शेषमस्तकीं ठेलीं. ११
ह्या उंच उंच ह्याच्या शाखा पाहोनि अंबरीं जातां,
वाटे काय मला तें सांगावें काय म्यां तुला आतां. १२
वर वर शाखा चढती वाढत तों जाय आमचें वित्त,
ऐसें वाटुनि माझें आनंदानें उचंबळे चित्त. १३
येथें गड्यांसवें म्यां बाळपणीं मारिल्या अनेक उड्या;
घालित होत्या माझ्या बहिणी ह्याच्या सभोंवती फुगड्या. १४
इकडे श्रमलों आह्मीं ऐसें पाहोनि आमची आई,
प्रेमभरानें आह्मां कुरवाळुनि आमचे मुके घेई. १५
खेळत असतां इकडे बाबांनींही मधेंच येऊन
उचलून कौतुकानें जावें आह्मां घरांत घेऊन. १६
इकडेच नित्य हर्षें सोबतिणी आपल्या करुनि गोळा,
खेळत होत्या माझ्या बहिणी चुकवून आमचा डोळा. १७
येतां तशांत इकडे पाहुनि आम्हां उठोनि सर्व मुली,
खो खो हांसत ह्मणती—आटपली जा मधांच भातुकली. १८
बाल्य तसें तारुण्यहि बा रे येथेंच आमचें गेलें,
वडिलीं तसेंच आह्मीं विश्रामस्थान हें सदा केलें. १९

क्रमिले इथेंच हर्षें भार्येसह म्यां वसंत पन्नास;
येतां ह्यास फळें नच शिवलों आह्मी कधींहि अन्नास. २०

झाड न हें आंब्याचें–ही माझी होय संपदा सारी;
इच्छा हीच असे–हें राहो आहे तसेंच या दारीं ! २१

राहील नित्य राहिल, जों ह्या हातांत दंड हा आहे
तोंवरि कोण बघूं दे ह्याजकडे वक्रदृष्टिनें पाहे ! २२

जा शीघ्र दूर जा तूं ! आहे बा लागली तुझी दृष्टि
ह्मणुनी झाड पहा तें झालें आहे किती तरी कष्टी ! २३

थर थर कांपे त्याचा देह, गळूं लागलीं पहा पानें !
जा शीघ्र जा तुझ्या हें माझें करपेल झाड तापानें ! २४

येवोत वादळें बहु, वर्षो घन घोर मुसळधारांनीं,
झाड असेंच उभें हें माझें राहील ह्या तरी रानीं ! २५

हें मज तसेंच माझ्या सुखकर होईल रे मुलांबाळां;
तुज काय, झाड माझें येइल हें तोडितां न त्या काळा ! २६

# जगद्देवचरित्र.

[ राजदासी. ]

ज्या औदार्यघनांस याचकशिखी पाहोनि संतोषले,
आर्यावर्त समस्तही निज यशें ज्यांनीं अलंकारिलें,
ज्यांसंगें त्रिदशालया रसिकता गेली असें सांगती,
ते श्रीविक्रममुंजभोजनृपती वंशांत ज्या जन्मती,— १

त्या वंशास अशी विभूषित करी जी राजरत्नावली,
होता तींत नरेंद्र एक **उदयादित्या**भिधानें बली;
न्यायें मालवभूमिकेस असतां शासीत तो भूपति,
गेले लोक समस्तही विसरुनी श्रीविक्रमाची स्मृति! २

यथाकालीं तेव्हां विपुल जल वर्षे जलदहीं,
समृद्धीला झाली ह्मणुनि वरिती मालव—मही;
लतावृक्षश्रेणी सुमनफलभारा प्रसवुनी
वनश्रीलावण्या प्रकट करिती संतत वनीं. ३

दाते याचकमंडळीस झटती संतोषवाया सदा,
बाधा यास्तव ती क्षुधा न शकली कोणा कराया कदा;
कोणीही न यशोधनेतर धना पाहोनि मोहीं पडे,
कामक्रोधमदादिकां न ह्मणुनी वास्तव्य तेथें घडे. ४

पतिव्रतपरायणा असुनि सर्वही कामिनी
स्वकांतहितचिंतनीं दंगडिती अहर्यामिनी;

स्वतात शिव केवल स्वजननी भवानी सती,
मनीं धरुनि भाव हा सुत गुरुद्वया सेविती. ५

होत्या दोन नराधिपास ललना; त्यामाजि **लीलावती**
रूपें श्रेष्ठ, दुजी यशें मिरविली ती **चारुशीला** सती;
नामें मूळ कथानकांत दिधलीं नाहींत त्यांचीं खरीं
त्यांच्या मीच ह्मणूनि नामकरणा शीलाप्रमाणें करीं. ६

त्या लावण्यलताच केवळ जरी दोघीहि होत्या तरी,
भूपप्रीति निरंतर प्रकटली लीलावतीच्या वरी;
ती शृंगारसरोविहारकुशला लीलावती सुंदरी
क्रीडारंग अनेक दावुनि मना राजेश्वराच्या हरी. ७

त्या लावण्यापगेला मनुजपतिमनोमीन मोहोनि गेला,
तत्संग स्वर्गभोगाहुनी अधिक गमे सौख्यकारी नृपाला;
झाला आसक्त ऐसा निजपति उदयादित्य लीलावतीला
पाहोनी स्वांतरंगीं बहुत हळहळे सर्वदा चारुशीला. ८

होतां क्रुद्ध पतीस नम्रवचनें बोलोनियां शांतवी,
संभोगातुर पाहतां रुसुनियां तद्वासना चेतवी,
जातां दूर ह्मणे रहाच जवळी, येतां स्वभावें रुसे,
देतां स्पष्ट नको ह्मणे, न ह्मणतां घे रोष दावीतसे. ९

हे सारे बाह्यरंग प्रकट करुनियां चित्तवृत्ती नृपाच्या
केल्या लीलावतीनें हरण; न करिती काय लीला स्त्रियांच्या!
ऐसा जो बद्ध केला परम दृढ अशा मोहपाशें, तयाला
जावें वाटेल कैसें सहज घडिभरी चारुशीलालयाला? १०

ऐसी सानंद नित्य क्षितिपतिसहित क्रीडतां राजपत्नी
झाली लीलावती ते सुकृतसुखफला पावुनी गर्भवत्नी;
होतां संपूर्ण गर्भ प्रसवति सुमुखी जाहली नंदनातें,
रायानें आवडीनें **रणधवल** असें दीधलें नाम त्यातें. ११

स्वस्थानीं चारुशीला पतिविण असतां काळ कंठीत खेदें
भेटी देऊनि राजा मुदित करि तिला स्वीय वीर्यप्रसादें;
तेणें होवोनि गर्भप्रभव तदुदरा ये **जगद्देव** वीर,
गातां ज्याच्या चरित्रा वरुनि बहु सुखा नाचले भाटमोर. १२

वर्षें द्वादश लोटलीं परि जगद्देवा न ठावा पिता,
नाहीं आयकिली तशीच धरणीपाळेंहि त्याची कथा;
हें आश्चर्य म्हणे कवीच, मग कां वाटो न विद्वज्जनां ?
आहे मूळ कथानकांतुनि परी ही घेतली कल्पना. १३

वाटे दैवदशा चुकूनि वळली त्या चारुशीलेकडे
भूपाची, ह्मणुनी सखीवर तिच्या दृष्टी अकस्मात् पडे !
बोलावूनि तिला समीप वदला तो माळव्याचा धणी—
'आहे काय सुखी कनिष्ठ ललना माझी तुझी स्वामिणी ? १४

'सांगें गे परिचारिके मज—किती आहेत बाळें तिला ?
'कीं स्वापत्यमुखावलोनसुखीं हेतू तिचा राहिला ?
माझी गांठ पडे न यास्तव मनीं दुःखी असे काय ती ?
'किंवा कांतवशीकरार्थ फिरते धुंडीत मुंडी यती ?' १५

ऐशीं नृपाळवचनें परिसोनि दासी,
ती बोलली करुनि वंदन तत्पदासीः—

"होतें विनन्ति करणार, परंतु राया !
येईल रोष ह्मणूनी न शकें वदाया." १६

हांसोनियां नृप वदे—"पुरुषार्थ काय
कोपोनि हा तुजवरी वरणार राय ?
बोलें सुखें त्यजुनि सर्वहि भीतिशंका !
दंडील हा नरपती न अनाथ रंका !" १७

अभय वचन ऐसें ऐकतां भूपतीचें,
सकल भय लयाला पावलें शीघ्र तीचें.
नमुनि पुढति भावें राजयाच्या पदासी,
पसरुनि पदरा ती बोलती होय दासी. १८

"ग्रीष्मर्तुप्रखरातपें करपुनी जावी जशी मालती,
केली त्वद्विरहानळें कृश तशी ती चारुशीला सती;
'तीला भेटुनि एकवार शमवा' ऐसें वदाया मला
झाला धीर, ह्मणूनि दास जन हा दंडूं नये आपला ! १९

राया ! नाथ तुह्मी असूनि तुमची झाली अनाथा प्रिया !
राज्याची असतां धनीन, कवडी नाहीं विडा खावया !
देतां नित्य तुह्मी नवीन वसनें लक्षावधी याचकां,
नेसायास परी प्रियेस तुमच्या शालू असे फाटका ! २०

राया ! वीर्यें कुमर तुमच्या चारुशीलोदरातें
आला, त्याचें स्मरण अगदीं काय नाहीं तुह्मांतें ?
बारा वर्षें असतिल पुरीं जाहलीं त्यास आतां;
हा हा ! नाहीं विदित अझुनी ही तुह्मां काय वार्ता ? २१

राजेन्द्रा ! दुभती त्रिकाळ तुमच्या गोठ्यांत गाई ह्मशी,
देतां नित्य तुह्मी बहु द्विजजनां धेनुप्रदानें तशीं;
चित्तीं लाज मला परंतु वदतां वाटे प्रजापाळका !
कष्टें वाढवितों कुमार तुमचा पाजोनि पिष्टोदका ! २२

राया ! ज्याच्या पित्याच्या सदनिं नवनिधी नांदती सर्वकाळ
व्हावा त्याला कसा हो हर हर ! नकळे घोंगडीचा दुकाळ !
रत्नांचे बाप ज्याचा भरभरुनि पसे ब्राह्मणां नित्य वांटी,
त्याच्या कंठीं मिळेना मणि ह्मणुनि नृपा बांधिली गारगोटी ! २३

घांसूनि रत्नमुकुटावलि पार्थिवांच्या
घट्टे अनेक पडले चरणांस ज्याच्या,
मागे तदीय सुत खेळगड्यांकडून
जोडे, खडे निजपदीं रुततां, रडून ! २४

ज्याच्या पित्याजवळ आज असंख्य वाजी
दारीं तशाच झुलती गजराजराजी;
खेळावयास्तव तयाप्रति लांकडीही
घोडा नसे ! विधिदशा किती वांकडी ही ! २५

आज्ञा होतांच ज्याची क्षणही न लगतां घेउनी द्रव्यराशी
पूजाया पाय ज्याचे अगणित नृपती तिष्ठती द्वारदेशीं;
पुत्राची त्या नृपाच्या परिजन करितां पाहुनियां टवाळी,
दुःखानें माय त्याची टप टप नयनांतून अश्रूंस गाळी ! २६

नाहीं पाय अझूनि हे नृपवरा तेणें जरी पाहिले,
ह्या अंकीं सुतरत्न तेंहि न जरी अद्यापिही वाहिलें;

वारंवार तथापि छंद तुमचा घेऊनियां तो रडे;
दीर्घोच्छ्वास वमीत मूर्च्छित तर्यीं ती माउलीही पडे. २७

स्त्रीचे सद्गुण हें वशीकरण जी जाणे पतीचें सती,
राया काय फिरेल ती गुणवती धुंडीत मुंडी यती ?
पातिव्रत्य जिचें विलोकुनि मनीं तारामती लाजती,
तच्छीलाविषयीं तुह्मां नरपती शंका कशी वाटती ? २८

देवाग्निद्विज यांसमक्ष वरिली मानूनि जी स्वप्रिया,
व्हावी कां इतक्यांत अप्रिय तुह्मां ती सर्वथा राजया ?
त्या दुर्दैवविलासिनीस अगदीं पाहूं नये लोचनीं,
ऐसा तो अपराध काय घडला आहे तिच्यापासुनी ? २९

कांता ती तुमची, तुह्मांविण तिचा स्वामी न कोणी असे;
स्वीकारा अथवा त्यजा, हटकिता कोणी तुम्हांला नसे;
त्या साध्वीस परंतु दोष नसतां त्यागूनि, राजोत्तमा !
बुद्ध्या शुभ्र यशःपटास तुमच्या कां लावितां काळिमा ? ३०

दैवीं सौख्य तिच्या नसेल लिहितां आलें सरोजासना,
द्याया सौख्य तिला कशी मग तुह्मां होईल हो वासना ?
सौख्यें सर्व परी पराङ्मुख तया बाळास व्हावीं, असें
त्या धात्यास तसें तुह्मांसहि अहो राया रुचावें कसें ? ३१

असंख्य असती जरी नवसिलीं तुह्मीं दैवतें,
तथापि नच रत्न जें नृपवरा कधीं लाधतें,
कुमार उदरीं अहा ! उपजला असोनि असा
तुह्मी त्यजितसां कसा निपट जारसंभूतसा ? ३२

सोडा सोडा नृपति सगळा आज संदेह सोडा !
जोडा जोडा परम विमला भव्य कीर्तीस जोडा !
तारा तारा स्वजन, बुडतो दुःखसिंधूंत, तारा !
वारा वारा करुनि करुणा आमचा ताप वारा ! ३३

महाराजा ! आहे अभय मजला आपण दिलें,
ह्मणोनी हीं वाक्यें त्यजुनि तुमची भीड वदलें.
तुह्मी आहां दीनां जनकजननी, हें समजुनी
वृथा कां हो व्हावें सभय मग आह्मीं परिजनीं ? ३४
कीर्तिश्री नरनायका न तुमची व्हावी कधींही उणी,
दुःखापासुनि मुक्त होउनि सुखा माझी वरो स्वामिणी,
या भावें वदलें उणें अधिक जें कांहीं तुह्मां राजया !
तें वाटेल तुह्मांस अप्रिय तरी चित्तीं असों द्या दया ! ३५
यद्भर्ता निजरूपयौवनमदें स्पर्धा स्मराची करी,
तीची यौवनकोरिका विकसल्यावांचून कोमे, तरी
कां हो तीवर एकवार उदयादित्या कराना कृपा ?
औदार्यास अपात्र एक तुमच्या कां तीच व्हावी नृपा ? ३६
सुवर्णमणिमंचकीं मृदुल पुष्पशय्येवरी
करोनि शयना जिची सवत घालवी शर्वरी,
बघोनि करितां तिला शयन भूमिपृष्ठावरी
प्रजाप्रतिच एकटा हळहळेल न स्वांतरीं ! ३७

स्वीकारार्ह स्वकांता असुनि जरि तुह्मां ती न वाटे नृपाळा,
त्वांकीं अद्यापि घ्याया खचित जरि तुह्मी शंकतां त्याहि बाळा,
नाहीं नाहीं क्षमेची गरज मग मला प्राण जावोत माझे !
लागेना स्वामिकार्यीं, तरि मग तनु ही व्यर्थ पृथ्वीस ओझें ! ३८

माझे बोल जरी तुह्मां न रुचती राजेश्वरा ! कां तरी
घ्याना शस्त्र करीं ? कशास धरितां शंका वृथा स्वांतरीं ?
आधीं छेदुनि ही मदीय रसना टाका कशी या क्षणीं !
देई जी हृदयास फार तुमच्या संताप दुर्भाषणीं ! ३९

सुवर्णमणिभूषणीं मिरवितां निज स्वामिनी
कधींहि अवलोकिली जरि नसेल ह्या लोचनीं,
निरर्थकचि दृष्टि ही मज असो कशाला अशी ?
करो न तुमचा मला नयनहीन कां हा असि ! ४०

राया दाखवुनी प्रसाधनकलानैपुण्य नानापरीं
ती राणी तुमची जरी न अझुनी शृंगारिली ह्या करीं,
ह्यांचा भार तरी तनूस मग ह्या व्हावा वृथा कासया ?
ह्यातें छेदुनि टाकितांहि तुमच्या स्पर्शो न चित्ता दया ! ४१

जळत असतां दुःखाग्नीनें निरंतर ती सती,
अझुनि हृदया ह्या प्राणांची सुटे नच संगती;
द्विविध ह्मणुनी त्या शस्त्रें ह्या क्षणीं हृदया करा !
सहजचि मग प्राणां तेथें मिळेल न आसरा ! ४२

घेती यत्कुलकीर्ति केवल उटी मानूनि दिग्सुंदरी,
त्या मी लावियलें जरी न उटणें घालोनि पायांवरी,
पायांचा उपयोग काय मग ह्या राया असावा मला ?
टाका छेदुनि ! शस्त्र कां न उचला ? कां हो मनीं शंकलां ? ४३

[ अपूर्ण. ]

# हिंदुस्थानावर शिकंदराची स्वारी.

[ "आर्यभूपर्यटन" नामक काव्याच्या हस्तलिखित प्रतींतून पुढील उतारा घेतला आहे. या काव्याचें संविधानक असें आहे कीं, हिंदुस्थावर स्वारी करण्यास निघण्यापूर्वी शिकंदरानें आपल्या पदरच्या एका हिंदु मनुष्यास जवळ बोलावून, पुढील उताऱ्यांतील १४ व्या श्लोकांत वर्णिलेली कामगिरी त्यास सांगितली. हिंदु मनुष्याच्या बापास कांहीं कारणावरून देशत्याग करावा लागल्यामुळें तो शिकंदराच्या आश्रयास येऊन राहिला होता. ह्याची जन्मभूमि पाटलीपुत्र अथवा पाटणा शहर होतें. सदर हिंदु मनुष्याचे मनांत स्वदेशप्रीति पूर्णपणें वसत असल्यामुळें शिकंदराचें मन हातीं धरलेल्या कामापासून परावृत्त करण्याचा त्यानें यत्न केला; कारण त्यास पक्कें माहीत होतें—

कीं जया रिपु शिकंदर हा रणीं,
ऐकिला जय तयास कधीं कुणीं ?

परंतु त्याचा कांहीं उपयोग न होतां, शेवटीं त्यास शिकंदराचें ह्मणणें मान्य करून हिंदुस्थानांत येणें भाग पडलें आहे. प्रवास करितांना त्यास जीं जीं स्थळें आढळलीं त्यांचें त्यानें ऐतिहासिकदृष्ट्या वर्णन केलें आहे. शिकंदराचा उत्साहभंग होण्यासाठीं हिंदु मनुष्यानें केलेलें भाषण आणि त्याला शिकंदरानें दिलेलें उत्तर हीं पुढील पद्यांत वर्णिलीं आहेत. ]

"राया ! कांहींच नाहीं स्मरण मज जरी आपल्या जन्मभूचें,
केलें आहे तथापि श्रुत जनकमुखें सर्व म्यां वृत्त तीचें;
तेणें भासे मला ती निजजननमही नित्य दृष्टीसमोर,
पुत्रीं जीच्या रिपूंचा समद पळविला संगरीं दूर धीर. १

जिंकाया आर्यवीरां कवण उपजला ह्या महीमंडपांत ?
राया घालावया कां अहिदशनपथीं इच्छिसी व्यर्थ हात ?
दैवें संपादिलें जें विमल यश तुवां आजपर्यंत युद्धीं,
त्याची रक्षा कराया कुठुनि उपजली ही तुला दुष्ट बुद्धि? २

राया ! आजवरी तुझ्या रणमुखीं जे राव झाले बळी,
तैशा भीरु भटां नसे प्रसवली ती आर्यभू माउली !
माता विश्वजनस्तुता, मग सुतां दौर्बल्य यावें कसें ?
सिंहीच्या उदरीं कुणीं परिसिलें जन्मास येतां ससें ? ३

जीच्या दक्षिणपूर्वपश्चिमपथां रत्नाकरें वेढिलें;
कीं ईशेंच तयांस आर्यमहिच्या संरक्षणा योजिलें !
झाला तोहि नगेश रक्षक उदग्भागा जिच्या, ती कशी
जिंकाया शकसील तूं ? यश नसे राया अशा साहसीं ! ४

तेजोभंग करावयास्तव तुझा ही बोलिलों मी गिरा—
ऐसा संशय मानसीं न तुझिया येवो नराधीश्वरा !
मी रात्रंदिन चिंतितों निजमनीं कल्याण तूझें नृपा !
त्राता कोण मला पराङ्मुख तुझी होतां दयाळा कृपा ?" ५

माझी वाणी परिसुनि अशी, कंपित क्ष्मातलातें
पादाघातें करुनि, वदला भूप तो काय मातें—
"कां रे भ्याडा मज भिवविसी ? वीरमाता ह्मणाया
माझ्या मातेविरहित दुजी कोण योग्या जगीं या ? ६

अश्वारूढ स्वयें मी तळपत असतां खड्ग हस्तीं धरोनी
सैन्याच्या मध्यभागीं, कवण मजपुढें ये रणीं शस्त्रपाणी ?

भाग्याचा कोण ऐसा मजविण पुतळा अन्य जन्मास आला,
ज्याला युद्धीं जयश्री त्यजुनि मज सुखें सांग घालील माळा? ७

मुखें वीरश्रीनें टवटवित ज्यांचीं विलसती,
तशीं हस्तीं ज्यांच्या लखलखित शस्त्रें झळकती,
अशा माझ्या योद्ध्यां बघशिल तयीं बा तुज कळे—
हिमाद्रीचे फोडूं शकतील कडे हे निज बळें! ८

ज्यांच्या कर्णकपाटभेदक रवा ऐकोनि तत्काळ भी
मानावी निज मानसीं रिपुजनीं, ऐशा यशोदुंदुभी
माझ्या जों न धडाडल्या तंव तुला वाटेल कैसें मुला
कीं हा आर्यभटाभिमान समरीं झाडावया जन्मला? ९

केला आर्यभटीं पराभव रणीं माझा, तरी त्यामुळें
माझी कीर्ति न होय दूषित जनीं; कीं ते बळें आगळे.
देतां पाठ तिहीं परी मज, तरी माझी करी साम्यता
ऐसा वीर मिळेल कोण मग हें ब्रह्मांड धुंडाळितां? १०

पावो आर्यभटांसवें झगडतां युद्धांगणीं हा जया,
किंवा त्या करवीं रणांत करवो हा स्वीय वीरक्षया,
त्याचें काय तुला अगत्य? करितों आज्ञा तुला जी तिला
देईं मान जरी असेल करणें कल्याण माझें तुला! ११

संगें घेईं न कोणा; विदितहि गुज हें त्वां करावें न अन्या;
जा ये पाहोनियां ती निज जननमही सर्वलोकैकधन्या;
आज्ञेनें आज माझ्या त्यजुनि झडकरी वेश हा हो प्रवासी,
जेणें कोणी करावी अटक न तुजला हिंडतां अन्य देशीं. १२

विश्वासें कथिला मनोरथ तुला म्यां आपुल्या जो मनीं;
होवो दूषित न त्वदार्यपदवी विश्वासघातें जनीं !
मोहें आर्यमहीस पाहुनि तुला माझी न हो विस्मृति !
राजद्रोह करी तया बुधमतें नाहीं परत्रीं गति ! १३

द्याया आर्यमहीस आज इतकें ऐश्वर्य जीं साधनें
झालीं कारण, तीं तुवां सकळही शोधूनियां काढणें;
तैसें आर्यभटाभिमानहरणीं साह्यें जयाच्या यशा
पावे हा नरपाळ, ये बघुनियां छिद्राहि एका अशा !" १४

[ हिंदुस्थानावर स्वारी करण्याच्या निश्चयापासून शिकंदरास पराङ्मुख करण्याचा आपला यत्न निष्फळ झाला, आणि आपलें बोलणें त्याचा क्रोधाग्नि चेतण्यास कारण झालें, असें पाहून वरील आर्यपुत्रानें त्याचा कोप शमन करण्यासारखें थोडें भाषण करून तो हिंदुस्थानांत येण्यास निघाला. त्या प्रसंगाचें कवीनें केलेलें वर्णन— ]

"वचन मजला राया ! व्हावें न मान्य तुझें कसें ?
तुजवरि असे निष्ठा माझी, पित्यावरि जी वसे.
मजवरि तुझा राजेंद्रा ! हो न लोभ कधीं उणा !
बघुनि कनकक्ष्मेतें येतों त्वरें तव दर्शना." १५

"यशस्वी हो राया सतत !" वदुनी हें नृपतिला
तदाज्ञेनें म्यां हा कनकमहिचा मार्ग धरिला;
हटें त्या रायाचें वचन न जरी मान्य करितों,
तरी त्याच्या रोषें अनुदिन महद्दुःख वरितों. १६

सुमार्गीं लावाया अनयपथवर्ती जडजनां,
हराया दुष्टांचा बलमद, कराया सदवना,
जयां निर्मी विश्वंभर महिवरी, ते नरपति
अहा! क्रौर्यीं काळाहुनि न गमती लेश कमती! १७

परांच्या उत्कर्षा सहन करिती न क्षणभरी;
महत्त्वाकांक्षेच्या सतत पडती घोर विवरीं;
उणें कांहीं नाहीं, अनुकुळ सुखें सर्व असती,
तरी कां हे राजे क्षणभरिहि संतुष्ट नसती? १८

अहा! ह्यांच्या क्रौर्यें अगणित पुरें ओस पडलीं;
धरत्रीला स्नानें बहुत रुधिरांचींहि घडलीं;
महच्छोकाग्नीनें अमित जळल्या वीरयुवती;
तरी ह्यांची झाली अझुनि समरेहा न कमती! १९

हक्कांचें स्वप्रजेच्या सतत करुनियां रक्षण स्वाधिकारें
सौख्याचीही करावी स्वपरजनपदीं वृद्धि नाना प्रकारें,
ऐशी ही राजनीति त्यजुनि नृपति हे कां हराया पहाती
अन्यांचे हक्क गर्वें स्वपरसुखसदनांत घालोनि माती? २०

करोत नृप ते जसें रुचतसे तयांच्या मना;
तदाश्रित न द्यावया शकति दोष तद्वर्तना.
असो. बहुत लोटले दिन पथीं तशा यामिनी,
परी मज न कां दिसे अझुनि ती जगन्मोहिनी? २१

सामोरा कां न ये तो मज सकळ नगीं मानिलें श्रेष्ठ ज्यातें-
द्वारीं जो आर्यभूच्या वसुनि सतत दे क्षेम अभ्यागतांतें?

"द्वारीं आला पहा हो त्वरित कवण" हें आर्यपुत्रोत्तमाला
सांगे गर्जोनि, कां तो बघुनि मज खळा स्तब्ध गंगौघ झाला? २२

हंसाचे भार ते कां दिसति न मजला हिंडतां अंतराळीं?
कोठें तो चातक स्वानन पसरुनि जो मेघराया न्यहाळी?
कोठें ते कोकिलांचे मधुर रव—जिहीं पंचमा लाजवूनी
केली त्या सत्कवीचें हृदयपुर सदा आपली राजधानी? २३

कोठें तो मलयागरु?—प्रसवुनी ज्या धन्य झाली क्षिती?
कोठें तो वट वृक्षराज?—कुतुकें ज्या पांथ संलक्षिती?
कोठें तो सहकार?—फार महिमा ज्याचा पिकीं गाइला-
येतां देखुनियां वसंत पहिला ज्यानें वनीं पूजिला? २४

कस्तूरीमृग धांवतां न अझुनी मातें दिसों लागले;
कोठें ते वनगोसमूह?—चढतां जे पर्वतीं भागले?
कोठें मत्त करींद्र ते?—मदभरें जे चालतां डुल्लती?
कोठें तो मृगराज?—पाहुनि करी स्वप्राण ज्या सोडिती? २५
कोठें त्या मानसाचें विमल जल?—सुधा लाजली फार ज्यातें?
कोठें त्या पद्मिनी?—ज्या विकसति करितां भृंग गुंजारवातें?
कोठें ती चक्रवाकी?—प्रियकरविरहें होउनी शुद्ध वेडी
सैरावैरा फिरोनी प्रिय न उमगतां थोर आकांत मांडी? २६

न गणुनि पथीं क्लेशां कांहीं निरंतर हिंडतों,
अझुनि न तरी आर्यांचा कां दिसे मज देश तो?
चुकुनि अथवा जातों मी ह्या पथें भलतीकडे,
ह्मणुनि मजला आर्यक्ष्मेचें न दर्शन त्या घडे? २७

[ पुष्कळ चालून गेला, तरी आर्यभूमि त्याच्या दृष्टीस पडेना; ह्मणून शोकाकुल होऊन पुढील श्लोकांत वर्णिल्याप्रमाणें तिच्या दर्शनाविषयीं आर्यपुत्र आपली इच्छा उत्कंठापूर्वक दर्शवितो.]

ऐश्वर्य विद्या बल ह्या तिहींचें
होऊनियां स्थानचि, या महीचें
स्वामित्व जी भोगितसे, कधीं मी
पाहीन ती सुंदर आर्यभूमि ? २८

धरोनियां लोभ जिचा स्वचित्तीं
गेले बहु क्ष्माधिप चक्रवर्ती
शोधावया मृत्युपथा, कधीं मी
पाहीन ती सुंदर आर्यभूमि ? २९

विद्यावधू ज्ञानसुधारसातें
पाजीतसे नित्य जयां स्वहस्तें
ऐशा सुतां जी प्रसवे, कधीं मी
पाहीन ती सुंदर आर्यभूमि ? ३०

सौंदर्य एकत्र जिथें क्षितीचें
होऊनि दावी भगवत्कृतीचें
अगाध वैचित्र्य, अहा कधीं मी
पाहीन ती सुंदर आर्यभूमि ? ३१

लोभी जसा द्रव्यकरंडकातें
रक्षीतसे, तेविं सदाहि जीतें
संरक्षिलें आर्यजनीं, कधीं मी
पाहीन ती सुंदर आर्यभूमि ? ३२

कौशल्यशाळा वसुधातलाची,
जी होय माता सकला कलांची
सुवर्णभूनाम धरा, कधीं मी
पाहीन ती सुंदर आर्यभूमि ? ३३

घेवोनि चारी पुरुषार्थ संगें
जेथें रमा संतत सानुरागें
क्रीडा कराया वसली, कधीं मी
पाहीन ती सुंदर आर्यभूमि ? ३४

हरोनि अज्ञानघनांधकारा
संतोषवाया नरलोक सारा
ज्ञानार्क जेथें उगवे, कधीं मी
पाहीन ती सुंदर आर्यभूमि ? ३५

जिंकोनियां चीन, इराण, केले
म्लेंच्छांगनारक्तकपोल ओले
पुत्रीं जिच्या, सौख्यभरें कधीं मी
पाहीन ती सुंदर आर्यभूमि ? ३६

हरावया वैभवगर्व जीचा
बाहु स्फुरे नित्य शिकंदराचा
अहा अशी जन्ममही, कधीं मी
पाहीन ती सुंदर आर्यभूमि ? ३७

[ अखेर त्यास एकदांचा हिमालय पर्वत दिसूं लागला. त्यास पाहून आर्यपुत्रास सुचलेले विचार—]

अहा पुढें हा दिसतो हिमानें
आच्छादिलेला गिरिराज; ज्यानें
धरोनि शीर्षीं अपुल्या घनाला
छत्रापरी संतत शोभवीला. ३८

किंवा अधःपातभयें निराळीं
क्रीडावया स्वैर असेल भ्याली
विद्युत्प्रिया, यास्तव वारिधारें
धुंडोनियां पद्मभवांड सारें ३९

ह्या पर्वतीं निर्भय वस्ति केली
करावया स्वैर सदार केलि!
न चित्र हें संतत रंजवाया
कामी प्रियेला करितो उपाया. ४०

कीं हा वदान्योत्तम धूमयोनि,
ही क्षीरपूर्णा वसुधा करोनी,
जगज्जनानंदनिरीक्षणार्थ
उच्चस्थळीं ह्या बसला निवांत! ४१

असोनि अत्युच्चहि लंघनीय
मी मानवां, हें समजोनि काय
व्हाया सुदुर्लंघ्य तुषारराशी
वाहे सदा अद्रिप हा स्वशीर्षी? ४२

कीं स्वोदरीं कांचनरत्नखाणी
आहेत ज्या, त्यांस हरील कोणी
ह्या भीतिनें ह्या तुहिनांबराला
हा सर्व भूभृद्वर काय त्याला? ४३

कीं आटतां उदक सर्व जलाशयाचें,
होतां समस्त सरिदोघहि रिक्त साचे,
होईल फार उपयोग ह्मणूनि काय
हा सांठवी तुहिनराशि नगाधिराय? ४४

संतृप्त कीं करुनियां वसुधातलातें
जें राहतें उदक शेष पुढें, तयातें
ठेवी इथें जतन मेघचि हा करोनी—
कीं कां वृथाच करिजे निज वित्तहानी? ४५

असो परि नगेंद्र हा मज अलंध्य भासे मनीं;
विहंगहि न जावया शकति ह्यास कीं लंघुनी!
उपाय करुं कोणता सुगम व्हावया हा गिरी?
अहा अटकलोंच मी खचित आज मध्यंतरीं! ४६

मदागमन वाटलें प्रिय न आर्यमाते तुला
पथीं ह्मणुनि आडवा गिरि तुवांच हा घातला?
जरी मज शिकंदरें कपटबुद्धिनें प्रेरिलें
तरी अहित माउली तव नसेच म्यां चिंतिलें! ४७

जों जों जाईल लोभी त्यजुनि निजधना दूर तों तों तयाचा
वाढे लोभ स्ववित्तीं, अनुभव सकळां पूर्ण आहेच याचा;

तैसें जे जन्मभूचे भजक म्हणविती आपणा एकभावें,
त्यांची, जातां विदेशीं, निजजननमहीप्रीति वृद्धीस पावे. ४८

नको ह्मणुनि कोप तूं मजवरी करूं माउली!
नसेच मजला दुजें त्वदधिक प्रिय क्ष्मातलीं!
स्वयें ह्मणवितों तुझा तनय मी, तरी कां मनीं
धरूं भय गिरींद्र हा त्वरित जावया लंघुनी? ४९

कांटे हे रुतती पदीं घडिघडी मांसासही ओढिती,
काढाया जंव जाय तोंच पडलों वाटे स्वयें खालती;
टाळावा पथ हा तथापि दुसऱ्या मार्गेंहि जातां खडे
फोडूं पादतळास पाहति, मला जाऊं न देती पुढें! ५०

वारंवार विखार घोर करिती फूत्कार हे स्वाननें;
तेणें वाटतसे समाप्त बहुधा होईल माझें जिणें!
कोठें वृश्चिक हे, न जाणुनि पडे जों पाय त्यांच्यावरी,
तों क्रोधें करितात दंश; न सहे त्या वेदनांची परी. ५१

कोठें मत्त लुलाय हे, करुनियां आरक्त नेत्रद्वया
देती थोर शिळातळा चडकणा क्रोधांध होऊनिया;
कोठें व्याघ्र वराह हे भटकती भक्ष्यार्थ चोहींकडे,
त्यांतें पाहुनि हे कुरंग लपती जाळीमधें बापडे! ५२

पुढें आला वाटे बिकट पथ हा थोर मजला;—
ह्मणाया जो पांथा त्वरित परता हेंच सजला!
पहावें ज्या ठाया हिमचि दिसतें सर्व तिकडे;
वरी अभ्रें, खालीं हिम, न तिसरें दृष्टिस पडे! ५३

क्षणोक्षणिं भयंकरा चमकतात सौदामिनी;
असोनि दिन वाटतें निबिड पातली यामिनी;
न वृष्टि करितां दिसे घन, नसेहि वर्षा तरी
मदीय तनु भीजली, मतिहि जाहली बावरी. ५४

अहा कष्टें द्यावा पद तुहिनराशीवरि तरी
त्वरें जाई खालीं घसरुनि, न राहे स्थिर वरी;
अहा वारंवार क्षुभित हरिसा गर्जुनि मला
भयार्ताचा त्राता घनहि भिववायास सजला! ५५

मेघाची गर्जना ही मज गमत असे दुंदुभीचा दणाणा!
तैसी सौदामिनीची चमकहि दिसते धार जैसी कृपाणा!
तोयाच्या ह्या न धारा विशिखचि सुटले स्वर्धनूपासुनी हे!
हा नाहीं मेघ, वाटे वरुनि रणिं जयश्री उभा वीर आहे! ५६

आहा माझ्या श्रमाचें फळ मज बहुधा लागलें हें दिसाया,
अभ्रांचे हे थवेही हळु हळु गमती लागले दूर जाया;
बर्फाचे ढीग आतां क्वचितचि दिसती, स्वच्छ झाल्या दिशाही,
तेणें आलाच वाटे पथ सुगम पुढें ह्यांत संदेह नाहीं. ५७

अवाढव्याकार प्रथम गिरिचा ह्या बघुनियां
भयें गेली होती सकलहि मदाशाच विलया;
परी जों जों मार्ग क्रमुनि चढतों मी वरिवरी,
पुढें जाया तों तों मम ह्रदय उत्साहचि वरी. ५८

असूनि बहु उंचही बहुत किर्र झाडी वरी,
जरी बहुत हिंस्र हे पशुहि वागवी हा शिरीं,

तरी क्षितिधरेंद्र हा वसविला पहा मानवीं;
अहा मनुज धन्य हे, करितिल क्षमा ही नवी ! ५९

सारा अंधार जेथें क्वचितचि पवनस्पर्श व्हावा तनूला
ऐशा स्थानींच ज्याला बहु दिन घडला वास, त्याच्या मनाला
येतां बाहेर होतें बघुनि रविकरां जें महत्सौख्य, त्याचा
घेतों आज स्वयें मी अनुभव दिन हा मानुनी उत्सवाचा. ६०

प्रदेश रमणीय हा किति तरी पुढें पातला,
अहा बहुत हिंडलों परि असा नसे पाहिला.
सुदीन बहुतां दिशीं नयन हो तुह्मां हा असे;
नकाच दवडूं असा समय हा तुह्मी आळसें ! ६१

सुनील नवपल्लवा मज दिसे वनश्री कशी ?—
विवाहसमयोचिता परम रम्य बाला जशी.
जणूं प्रिय वसंत जों निजगृहीं नसे पातला,
अलंकृत न काय ही तंव करीच की आपला ! ६२

झाला प्रभात, अरुणें पिटिलें हयातें
सूर्याचिया गमतसे मम मानसातें;
पक्षी अनेकविध सुस्वर आळवूनी
गाती जणूं द्युमणिचीं बहु गोड गाणीं ! ६३

हीं श्वापदें फिरुनियां रजनींत रानीं
भक्ष्य स्वकीय मिळवोनि महा श्रमांनीं,
ये विश्वचक्षु उदयास न तोंच येती
आपापल्या स्थळिं न दर्शन त्यास देती ! ६४

आला हा रक्तिमा कीं निरखुनि पतिला प्राग्वधूच्या मुखाला;
कीं आला कांत गेहा ह्मणुनि जणुं हिनें स्वीय शृंगार केला!
पक्ष्यांचा ऐकुनी हा मधुर रव गमे पाहुनी ही पतीतें
शारंगी वाजवूनी हरिखचि अपुला स्वप्रिया दर्शवीते. ६५

हरिद्वर्णा झाली नव तृणभरें ही वसुमती,
वरी तीच्या मुक्तासम कण हिमाचेहि दिसती;
वियोगें रात्रीच्या उडुपनयनांतूनि पडलीं
गळोनी बाष्पें तीं क्षितिवरि जणूं हीं पसरलीं. ६६

जातां संथ उचंबळोनि करिती मध्यें त्वराहि क्षणें,
होतां शांतहि वाहती झुळझुळा मंजूळशा निस्वनें,
ऐसे रम्य सरित्प्रवाह करिती सान्निध्य ज्यांचें अशीं
पर्णाच्छादित हीं गृहें रिझविती मद्दृष्टिला फारशीं. ६७

कोठें रम्य सरोवरें, स्फटिकभा शुद्धोदकें ज्यांचिया
केली लज्जित, शारदेंदुकिरणां देऊनियां आश्रया;
मध्यें पूर्ण मनोहरा विकसल्या ह्या पद्मिनी कोमला,
ज्यातें पाहुनियां शरन्नवशशी वाटे मला कोमला. ६८

आलिंगनाविण तया कुसुमाकराच्या,
यावी न कीं टवटवीच तनूस जीच्या,
वाटे मला फुकट त्या वनराजिकेला
हेमंत हा झटतसे हसवावयाला. ६९

अत्युच्च देवतरु हे निजशीर्षघातीं
भेदावया गगनमंडप काय जाती;

भक्ष्यार्थ हिंडुनि निरंतर अंतरिक्षीं
यांच्या शिरीं श्रमुनियां बसतात पक्षी. ७०

भरतजनपदीं जो मानिला पूजनीय
सकळहि ह्मणती ज्या भूतळीं वृक्षराय;
तुहिनगिरि जसा तो श्रेष्ठ सर्वा नगांत,
वटहि परम तैसा मान्य हा पादपांत. ७१

पोटीं धरी वनचरां, शिरिं खेचरांतें,
दे सावली विपुल नित्यहि पांथिकांतें,
ऐसा करी बहुत हा उपकार; झाला
तेणेंच हा उचित संतत पूजनाला. ७२

स्तंभप्रायचि हे तमाल विटपी झाले नभोमंडपा,
मल्लीनें सहकार हा कवळिला होऊनियां निस्त्रपा;
देतो नूतनपल्लवातिशयंही शोभा बहू किंशुकां;
आहे संप्रति पुष्पहीन तरिही देते वनश्री सुखा. ७३

हे मंद मंद सरिदोघ वहात जाती,
दोन्ही तटीं विविध वृक्षहि शोभताती;
देती अशोक बकुलादिक हे पिकांतें,
आला विपत्समय जाणुनि आश्रयातें. ७४

तूं ज्यावरी रुससि संप्रति तो पिका रे,
कोणावरी करिल रोष पहा विचारें!
त्याचाच दुःसह तया विपदोघ झाला,
अन्यास साह्य करवेल कसें तयाला? ७५

अर्पूनियां निजशिखंडक बोळवीले,
स्वप्राणमित्र मुदिरास परंतु झाले;
जे खिन्न फारचि विशोभित काय होतां,
ते हे मयूर लपतात सलज्ज आतां ! ७६

प्रावृट्काळ नसोनि कां पसरिती शारंग हे स्वाननां ?
ह्यांच्या दुर्विधिनेंच काय करुणा सोडूनि गेली घना ?
झाले भ्रांतचि हे चकोर, नसुनी आतां शरद्यामिनी
हेमंतामृतरश्मिलाच बघुनी संतुष्ट होती मनीं. ७७

[ हिंदुस्थान दिसूं लागल्यावर आर्यपुत्राची स्थिति पुढील पद्यांत वर्णिली आहे. ]

करित हृदयीं होतों जीच्या अहर्निशि चिंतना,
बहुत सुख ती आर्यक्ष्मा दे अजी मम लोचना;
सुकृततरुला आलीं माझ्या फळें बहुतां दिनीं,
ह्मणुनि बघतों आजी मी ही जगज्जनमोहिनी. ७८

दोषांचे पदरीं असंख्य अमुच्या राशी असावे तरी,
माते आजवरी तुवां दवडिलें आह्मांस देशांतरीं;
गेला तात मरोनि ! संतत तुला चिंतीत होता मनीं !
हा हा ! आमरणांत लक्ष्य जडलें त्याचें तुझ्या दर्शनीं ! ७९

स्वप्नींही बहुधा नसेल जननी ज्यांनीं तुला पाहिलें,
तेही आतुर दर्शनास्तव तुझ्या होऊनियां राहिले;
व्हावें सौख्य किती तयांस तुजला फारां दिसीं पाहुनी,
जे त्वत्पुत्रचि आपणां ह्मणवुनी घेतात हर्षें जनीं ? ८०

तातें ऐकविल्या तुझ्या बहु कथा मातें, परी जोंवरी
नाहीं म्यां तुज पाहिलें सुख मला झालें न तों अंतरीं;
होता त्यास वियोग दुःसह तुझा; मातेंहि चिंता मनीं,
कीं केव्हां निववीन मीं स्वनयनां हर्षें तुला पाहुनी. ८१

गेले सोडुनियां स्वदेश जन जे त्या अन्य देशांतले,
त्यांनीं जन्ममहीप्रती स्वनयनीं नाहीं पुन्हां पाहिलें;
काळें सोडुनियां तुझे सुत तुला जातात माते! जरी
त्यांचें चित्त तुझ्याकडेच सगळें लागून राहे तरी. ८२

गेला स्वीय कलत्रमित्र अवघे सोडूनियां मत्पिता,
त्याला दुःसह जाहली न बहुधा त्यांची वियोगव्यथा;
वारंवार परंतु फार रडला होतां तुझी त्या स्मृती,
त्याची ती वदतां नयेच मजला अत्यंत दुःखस्थिति. ८३

मद्वक्त्रा कुरवाळुनी गहिवरें बोले सदा तो मला,
"बाळा आर्यमहीवियोग तुजला माझ्यामुळें जाहला!
"म्यां येथें तुज आणिलेंच नसतें ह्या पारतंत्रीं, तरी
"आनंदें असतास आज अपुल्या त्या जन्मभूमीतरी!" ८४

वाटे दुःख मलाहि या परिसुनी बोलास त्याच्या; परी,
होती पाहिन जन्मभूस ह्मणुनी आशा मला अंतरीं;
झालों मी असतों निराश जरि ह्या बोलें तयाच्या मनीं,
होती प्राप्तचि ती स्थिती मज, तया जी ने कृतांताननीं. ८५

दुःखें आज लयास तीं सकलही गेलीं पहातां तुला,
आनंदाश्रुजलौघ अस्खलित हा नेत्रांतुनी चालिला;

मार्गींचे श्रम सर्वही विसरलों, चिंता पळाली दुरी,
देतों आज बुडी स्वयें गमतसे आनंदरत्नाकरीं. ८६

स्वर्लोकाप्रति नंदन स्वविभवें शोभा जशी देतसे,
सौंदर्यें अपुल्या जयें क्षितितला ह्या शोभवीलें तसें
त्या ह्या आर्यमहीकपालतिलका काश्मीरदेशाप्रती
आनंदातिशयें बघूनि सुख मी भोगीतसें संप्रति." ८७

# सह्याद्रि.

कोठें दुर्गम उंच उंच शिखरीं भेदोनि तारापथा
विंध्याद्रिव्रत आचरोनि अडवूं पाहे रवीच्या रथा;
कोठें भार्गवराममार्गणभयें जो भीरु मागें पळे
त्याचा मारहि साहुनी पुरवितो प्रेमें मुलींचे लळे; १
कोठें खोल महा भयानक दरी पाहोनियां ज्यांकडे
सूर्याचे करही भयें दचकुनी माघारती बापडे;
कोठें घोष करीत पुण्यतटिनी जातां समुद्राकडे
खालीं आदळती धडाधड जणूं पापाचलाचे कडे! २
कोठें शीतळ वाहती झुळझुळां अच्छोदकाचे झरे
ज्यांच्या केवळ दर्शनेंच सगळी तृष्णा जनांची हरे;
कोठें रम्य सरोवरें, स्फटिकभा शुद्धोदकें ज्यांचिया
केली लज्जित शारदेंदुकिरणां देवोनियां आश्रया; ३
कोठें व्योमपथें महीरुह शिरें उंचावुनी आपलीं
घालाया बघती जणूं निजगळां निःसार मेघावली;
कोठें पालवतां लता रुचिरता साऱ्या प्रदेशास ये
वाटे पांघुरली सुरम्य हिरवा शेला वनश्री स्वयें; ४
कोठें त्र्यंबकराजपुण्यमहिमा वर्णीत गोदावरी
जातां पंचवटीवरून नमन श्रीरामचंद्रा करी;

भीमाशंकर सोडुनी निज सखी घेवोनि नीरा सवें
कोठें नेउनि पंढरीस वसवी भीमा जनांचे थवे; ५
कोठें धौममहाबलेश्वरपदा सोडोनि जातां पथीं
कृष्णेला बहु कोयनादिक सख्या येवोनियां भेटती;
कोठें जी ह्मणती प्रयागमहिमा सारा हिरावोनि घे
हाराया करवीरतापमलही ती पंचगंगा निघे; ६

ताराया भजकां सदाशिव कुठें ज्योतिःस्वरूपें वसे;
कोठें येउनि ही हिमालयसुता ह्या सप्तशृंगीं बसे;
कोठें ह्या विवरीं लपोनि बसती बौद्धादिकांच्या कृती,
होते कुंठित ज्यांकडे निरखितां कारागिरांची मती; ७
कोठें हे उंच माना करुनि गड यशस्तंभ राया शिवाचे
देती आह्मां मराठ्यां स्मरण घडिघडी आमच्या वैभवाचें;
गेला! तो काळ गेला निघुनि! विभवही नष्ट तें सर्व झालें!
गेलें तें तेज गेलें! पुरुषवरहि ते भाग्यशाली निमाले! ८

नाहीं घोरपडीशिवाय शिवली भिंतीस ज्याच्या शिडी,
फेंकाया शकले न दृष्टि रिपुही ज्याच्याकडे वांकडी,
तान्हाजीसम वीरसिंह पडला ज्याकारणें संगरीं,
त्या ह्या सिंहगडीं निरंतर शिवा स्वाराज्य आतां करी! ९
ज्याचा मावळुनी प्रतापतरणी केव्हांच गेला तरी
गर्वें मान वरी करोनि बसला जो ह्या गिरीच्या शिरीं,

तो हा पाहुनियां प्रतापगड त्या राया शिवाची कृती
त्याच्या वाघनखांसह स्मरुनियां तल्लीन होते मती. १०
जेथें ऐकुनि चौघडे धडकतां राज्याभिषेकोत्सवीं
नाचे हर्षभरें विरक्तहि तरी तो जावळीचा कवी;
त्या ह्या राजगडावरोनि भगवा झेंडा पडे खालतीं
ऐसें पाहुनियां गळे सहजची त्या मावळ्यांची धृती. ११
सह्याद्रे! तुज पाहुनी प्रथम जो आनंद झाला मला
त्याचा एकहि लेश यावरि नसे चित्तांत ह्या राहिला;
आतां राहुनियां इथें असुखची होणार आहे मना,
दुःखें यास्तव आज सोडुनि तुला ही चालली कल्पना. १२

# दुःखिताचें स्वसमाधान.

## आर्या.

होतां निष्ठुर मजवरि दैव, अहा! स्नेहबंध तोडून
गेले एकामागुनि एक मला आप्तमित्र सोडून! १
न सुचे काय करावें, रडती अन्नार्थ बायकापोरें;
जिकडे जावें तिकडे भेटे दुर्दैव नीट सामोरें. २
रडलों, आरडलों बहु, पायां पडलों; परंतु कोणास
आली दया न माझी; नाहीं कोणीं दिला मला घास. ३
दों दों हातीं तडतड ताडुनियां मी कपाळ हें घ्यावें;
कडकड बोटें मोडुनि शाप हजारों विधीसही द्यावे; ४
जावें शंभरदां मज वाटे घरदार सर्व सोडून;
ये मृत्युही न, होतों प्रार्थित जरि त्यास हात जोडून. ५
येतील ही मनाला आशा नसतांहि, चांगले दिवस
यावे म्हणुनि करावे भलभलते म्यां पदोपदीं नवस. ६
होइन धनाढ्य केव्हां? केव्हां बांधीन उंच माड्या मी?
पंक्ती आप्तजनांच्या केव्हां बसतील माझिया धामीं? ७
ज्यांच्या समागमाविण गेली माझी कधीं घडी न्हती,
जी जी ह्मणत पुन्हां ते मित्र कधीं नाचतील मजभंवती? ८

हीं दुःखें, ह्या चिंता, ह्या आशा, ह्या विवंचना असल्या
एकत्र सर्व होउनि माझ्या राशीस येउनी बसल्या. ९

होवोनि दीन ह्यांच्या त्रासानें ह्या असाच मी रडत
पडलों असतों मोहीं ह्या भवचक्रीं अखंड तडफडत. १०

नकळे परंतु पदरीं सुकृताचा काय माझिया ठेवा
होता, ह्मणोनि झालें स्मरण तुझें मज अशांतची देवा! ११

म्हटलें—जगदाधारा! पूर्ण तुझा मज असोनि आधार
भ्यावें कशास घ्याया दुःखाचा मी शिरावरी भार? १२

गेलीं निरसुनि दुःखें, विरल्या चिंताहि जागच्या जागीं;
पुरले सर्व मनोरथ, मानीं मी धन्य आपणालागीं. १३

न कधीं अनुभविलें तें दिव्य समाधान मानसीं दाटे;
धन काय? तुच्छ साऱ्या पृथ्वीचें राज्य त्यापुढें वाटे. १४

# मधमाशी.

## साक्या.

ये मधमाशी झडकरि ये गे! शंका न धरीं कांहीं!
लतामंडपाभवतीं माझ्या घिरट्या घालित राहीं! १
चैन पडेना मन हें झालें आहे फार उदास,
गुं गुं गुंजारवें तयाला द्याया ये उल्हास! २
ये इकडे ये हवीं कशाला रुक्ष तुला तीं शेतें?
तुला आवडे जें जें, आहे उद्यानीं ह्या तें तें. ३
पल्लव फुटले, दाट कळ्या ह्या कोठें नुकत्या आल्या,
पहा कुठें ह्या लता प्रफुल्लित नव कुसुमांनीं झाल्या. ४
उपवन माझें सर्व आज हें मधुमय होउनि राहे,
कोण तुझ्याविण मकरंदाचा भोक्ता ह्याच्या आहे? ५
झाली आहे दुपार, होतो ताप उन्हाचा फार,
तरि तूं जाशिल जिकडे तिकडे मीहि करिन संचार. ६
थांबशील तूं जेथें तेथें मीहि उभा राहीन,
झडकर उडतां पुन्हां कौतुकें तुजला मी पाहीन. ७
चल जा बस त्या पंकजकोशीं, मधुरस त्याच्या ठायीं
असेल तितका लुटोनि घे तूं उद्योगाचे आई! ८

इतकें आधीं चपलाईनें काम नीट सारून,
दे मग गर्वें हवें तरी तें पंकज झिडकारून. ९
धन्य शहाणे! धन्य तुझ्या ह्या निरलस उद्योगाची!
असे उन्हाळा कडक तरीहि न परवा करिशी त्याची. १०
वाण न पडतां पुढचे महिने आठ सुखानें जावे,
करिशी गोळा मिळेल तितकी सामुग्री या भावें. ११
असतिल झाले श्रम बहु तुज मधु गोळा करितां आज,
जा जा आतां घरास लवकर जों न जाहली सांज. १२
उघडीं ठेवुनि निजसदनाचीं चिमणीं दारें सारीं
उभ्या राहिल्या त्यांत पहा त्या तुझ्या सख्यांच्या हारी. १३
उत्कंठेनें तुझी गडे त्या पहात असतिल वाट,
चल गे तुमच्या भेटीचा तो पाहूं दे मज थाट! १४
गौरव करितां तुझा पाहुनी आज तुझ्या त्या आली
सलज्ज आह्मी सर्व आळशी माना घालूं खालीं! १५

# गृहस्थाश्रम.

## १. गृहिणी.

देतां निरोप कन्येप्रति सद्गदित स्वरें ह्मणे बाप—
“न करीं कुलमर्यादाभंग सुते! जाहला जरी ताप. १
“मर्यादाच सतीची शोभा; स्वच्छंदचारिणी युवती
“कुलकीर्तिमंदिराला लावुनि वन्ही सुखास आंचवती. २
“हा सासरा पिता तव, ही सासू माय आजपासून;
“स्वगुणें हो तूं त्यांची कन्येपेक्षांहि लाडकी सून. ३
“पाउल पुढें नको तूं टाकूं ह्यांना विचारिल्यावीण;
“आशीर्वाद शिरीं घे ह्यांचे संतत हरावया शीण. ४
“विनयें वर्तत जा गे थोर लहानांसवें घरीं दारीं;—
“कीं अभिमान लया ने चित्ताची सावधानता सारी. ५
“चित्त असावध होतां अस्थिरता प्राप्त होउनी मतिला
“जाते ह्मणती ज्ञाते सोडुनि सदसद्विचारशक्ति तिला. ६
“निष्कपट प्रेम सदा सर्वांभूतीं धरोनि वागावें;
“दोषैकदृष्ट होउनि लोकपरीक्षण करूं न लागावें. ७
“प्रेम सुखाचें साधन होय; तयाला जिथें नसे थारा
“बाळे! कधीं न वाहे सौख्याचा त्या दिशेकडे वारा. ८
“प्रेम जगाचें जीवन;—किंबहुना प्रेमतंतु एकवट
“करुनी विश्वेशें हा रचिला आहे विचित्र विश्वपट. ९

"आपण करूं तसा हा होतो सुखदुःखमूल संसार;
"देतो स्वर्गसुखा हा, दुर्गतिचें हाच दाखवी द्वार. १०
"सत्कृति करिती त्यांना देतो हा सर्वदा सुखानंद;
"दुष्कृति पावुनि दुःखा दुःखांचा ह्मास भाविती कंद. ११
"यास्तव दुष्कर्माचा बाळे घेऊं नको कधीं वारा;
"तुज संसार सुखानें ह्मणजे येईल सारितां सारा. १२
"रोष कधीं न धरावा, ध्यावा पदरांत आपला दोष;
"तेंच करीत असावें जेणें वाढे घरांत संतोष. १३
"असशी सुजाण, नलगे सांगावें तुज,–पतिव्रताचरणें
"साजे युवती; न तशी वसनें वा रत्नकांचनाभरणें. १४
"आज्ञा शिरीं पतीची आधीं मग कार्य घेत जा हातीं;
"करुनि अनादर पतिचा संसाराची करूं नको माती. १५
"सौभाग्यदायक व्रत पतिसेवेंसारखें दुजें नाहीं;
"यास्तव सोडुनि तें व्रत दुसरें तूं आचरूं नको कांहीं. १६
"चित्तीं तशीच ठेवुनि अढळ सदा सुप्रसन्नता वदनीं,
"होउनि तूंच रहागे लक्ष्मी प्रत्यक्ष आपल्या सदनीं. १७
"जा सासरीं, पतीचा सुखमय संसार आपल्या योगें
"करुनि, सदाचरणानें उभयकुलानंददायिनी हो गे!" १८

---

## २. गृहस्थ.

"वाहे सर्व जगाची जगदीश्वर काळजी; तया शरण
"भावें जाय पडेना वाण कशाचीहि त्यास आमरण. १

"यास्तव तुज ह्मणतों कीं-आठवुनी त्या दयाघना भावें
"सर्वां कर्मारंभीं आधीं त्याचेंच साह्य मागावें. २

"वागावें धर्मानें; मालवितां धर्मदीपकज्योति
"दुर्गम मार्ग समस्तहि संसारीं ह्या तमोमयी होती. ३

"जे वर्ततात धर्मै, कर्मै करितात ईश्वरा स्मरुनी,
"अवतार ईश्वराचे ते नर; इतरांस तारिती तरुनी. ४

"देव नको, धर्म नको, ज्यांस नको शास्त्र वा सदाचार,
"डोळस असूनिही ते जन्मांधाहूनि अंध साचार. ५

"न कळे तयांस निजहित, परहित करणार काय पामर ते?
"ऐकावे न तयांचे पाखंडी बोल धर्मकामरतें. ६

"बाप जगाचा ईश्वर, आपण आहोंत लेकरें त्याचीं;
"समजावया नको हें पदवी वेदान्तशास्त्रवेत्त्याची. ७

"डोळे उघडुनि बघतां सहज मनुष्यांस हें कळे नातें;
"मीपण तूंपण निरसुनि वृत्ति तदाकार होउनी जाते ८

"प्रतिबिंब होय विश्वचि हें एका ईश्वरी प्रभावाचें—
"कसलें मीपण तेथें? कारणही काय भिन्न भावाचें? ९

"कोणी गुणकर्मानें नांवारूपास माणसें आलीं;
"कोणा दुर्दैवानें प्राप्त न अद्यापि ती दशा झाली. १०

"देशपरत्वें होउनि काळीं, गोरीं, खुजीं, विजातींचीं—
"दिसलीं भिन्न तरी तीं भांडीं एकाच होत मातीचीं. ११

"घडिलीं इच्छामात्रें एका ब्रह्मांडभांडघटकें तीं,
"ह्याची साक्ष हजारो रूपें त्याचींच आपणां देती. १२

"स्थित्यंतरास पावुनि नाना वेषें मनुष्य हा नटला,
"काय ह्मणूनि तयाचा जातो मूल स्वभाव पालटला? १३
"आहे सर्वां ठायीं देहाची एक पाहतां ठेव;
"देई दशेंद्रियांची सर्वांसहि जोड सारखी देव. १४
"बनले असती ज्यांचे देह न परमाणु भिन्न ते असती;
"व्यापार इंद्रियांचे होतां सर्वत्र सारखे दिसती. १५
"बसले विकार चित्तां सर्वांच्याही धरोनियां साही;
"इहपरलोकसुखावर सर्वांची दृष्टि सारखी राही. १६
"परमात्म्याचा अंशहि—आत्मा—सर्वांत सारखा वसला;
"संबंध काय दुसरा ह्यापेक्षां अधिक पाहिजे असला? १७
"यास्तव मनुष्य जो जो भेटे तो आपला सखा करुनी
"सगळी प्रेमानंदें टाकावी ही वसुंधरा भरुनी. १८
"ज्याच्या चित्तीं संतत ही बंधुप्रेमभावना वसली,
"टाळी ब्रह्मानंदीं त्या पुरुषाची खरोखरी बसली. १९
"माझा मीच धनी; मज काय जनांशीं असे करायाचें?—
"सोपें ह्मणावया हें, कठिण परी फार आचरायाचें. २०
"परवा नसे जनांची ह्मणुनी जाऊनि एकटा विजनीं
"बसला कोण सुखानें आयुष्याच्या क्रमीत दिनरजनी? २१
"कोणी कोणावांचुनि आपणची बांधुनी घरें दारें
"केले सिद्ध अवश्यक चरितार्थाचे पदार्थही सारे? २२
"होउनि कोळी माळी साळी शिंपी सुतार लोहार—
"कोणीं कामें त्यांचीं आपणची सर्व पाडिलीं पार? २३

“जावी विदारिली तनु हिंस्र पशूंच्या न तीक्ष्ण नखरांनीं
“ह्मणुनि पिटाळुनि कोणी आपणची त्यांस लाविलें रानीं ? २४
“कोणीं कोणावांचुनि गांव वसवुनी उभारुनी शहरें
“ह्या सृष्टीस दिलें हें रूप मनोहारि आपल्याच करें? २५
“आपण लोकांसाठीं, लोकहि ह्मणुनीच आपणासाठीं—
“विसरूं नये कधीं हें, कीं ह्या प्रभुनेंच घातल्या गांठी. २६
“ह्या सोडितां न सुटती दिसल्या बाहेरुनी जरी सुटल्या;
“हटल्या भल्याभल्यांच्या शक्ति, न सहसा तथापि ह्या तुटल्या.
“ह्या विच्छिन्न न व्हाव्या इच्छा प्रभुचीच होय ही खचित;
“ह्मणुनी तसेंच वर्तन ठेवावें हेंच आपणां उचित. २८
“प्रेमें प्रेम बळावे, द्वेषानें अधिक वाढतो द्वेष;
“प्रेमें उदया आले, द्वेषानें ओस पाडिले देश. २९
“द्यावें घ्यावें ह्मणजे आपोआपचि परस्परीं वृद्धि
“होउनियां प्रेमाची, होते अन्योपकाररत बुद्धि. ३०
“आपण लेश न देतां घ्यायाची मात्र वासना धरितो,
“त्यास न कांहीं मिळतां आपण तो नाश आपला करितो. ३१
“ह्यास्तव हित इतरांचें जें जें होईल आपल्या हातें
“तें तें करीत जावें; निज हित तेणेंचि साधिलें जातें. ३२
“स्वार्थींच लक्ष्य केवळ ठेवुनि जे वागती सदा लोक,
“पर-सुखदुःखा पाहुनि ज्यांना होई न हर्ष वा शोक, ३३
“निजबुद्धिसंपदेचा घेती देती न भोग ते कृपण;
“जन्मुनि मनुष्यलोकीं त्यांच्या आंगीं नसे मनुष्यपण. ३४

“केला पहात असुनी दुष्काळानें सभोंवती कहर,
“स्वस्थ निजावें आपण खाउनि पिउनी यथेच्छ पोटभर– ३५
“धरिली तरी धरावी वृत्ति अशी ही जनावरांनींच;
“साजे न ही मनुष्यां, हितकर वा ही न भावना नीच. ३६
“जळतां शेजाऱ्याचें घर जो ओती न त्यावरी पाणी,
“तो मूर्ख तेंच संकट ओढुनियां आपणावरी आणी. ३७
“यास्तव परोपकारीं निजहित समजोनि देह झिजवावा;
“लोकीं जों न अनावर दुःखानल होय तोंच विझवावा. ३८
“देहाचा वित्ताचा बुद्धीचाही असा सदुपयोग
“जो नर करितो त्याला नलगे साधावया दुजा योग. ३९
“कष्टें संपादावें, आनंदानें बसोनियां खावें,
“राखुनि ठेवुनि कांहीं सत्पात्रीं देववेल तें द्यावें. ४०
“व्यर्थ न जाऊं द्यावा उद्योगावांचुनी कधीं काळ;
“कीं उद्योग करी जो लक्ष्मी त्यालाच घालिते माळ. ४१
“उद्योग निश्चयाची जे नर करिती धरोनियां कास,
“घेतात ते फळाचा भोग कधींना कधीं तरी खास. ४२
“प्रतिकूळ काळ आला ह्मणुनी उद्योग सर्व सोडून
“न कधीं घरीं बसावें पुरुषानें हातपाय जोडून. ४३
“आहे पुरुषार्थाची ज्या पुरुषाला खरोखरी चाड,
“ह्या काळ–बागुलाचा काय तया नरहरीपुढें पाड? ४४
“उद्योगाचें ज्यांच्या अंगीं सहसा न संचरे वारें,
“आहे माजविलें त्या काळाचें हें तिहींच देव्हारें. ४५

“येईल काळ उत्तम तेव्हां लावीन हात कार्याला—
“ऐसें ह्मणतां ह्मणतां मेले बहु, परि न योग तो आला. ४६
“आहे तसाच राहे काळ सदोदित, न जाय पालटला;
“सरला पुढें न अथवा मागें अणुमात्रही नसे हटला. ४७
“तो निर्विकार, त्याला नाहीं आकार रूप वा रंग;
“दिसतो तसा तसा तो घडतो त्याला जसा जसा संग. ४८
“कसला काळ ? कशाचें दैव ? पराक्रम करोनि पुरुषांनीं;
“सुंदर रूप दिलें ह्या सृष्टीला हें असंख्य वरुषांनीं. ४९
“असती सुखें समस्तहि उद्योगाचींच रे फळें गोड;
“काळें न वा न दैवें त्यांची कोणा दिली करुनि जोड. ५०
“पूर्वज यत्न न करितां काळावरि भार टाकुनी बसते,
“घोर अरण्यचि केवळ जग हें होऊनि राहिलें असतें. ५१
“काळाची न कला ही, उद्योगाचें चरित्र दाळा हें;
“हें रूप ह्या जगाला आज तयानें च आणिलें आहे. ५२
“जातां काळ रिकामा दवडावा सत्समागमीं तो—कीं
“क्षाळावया मनोमळ नाहीं दुसरा प्रयाग ह्या लोकीं. ५३
“घडला न सत्समागम, पडली ज्याच्या सदुक्ति न श्रवणीं,
“न पडे प्रकाश सहसा ज्ञानाचा त्याचिया मनोभवनीं. ५४
“ज्ञानप्रकाश नसतां सगळ्या विद्या कला वृथा जाती;
“जवळी असुनि सुखाचीं दिसती न फळें न लागती हातीं. ५५
“आगर सद्विद्येचे सुविचाराचेहि संत सागर ते;
“सुमति-सतीहि निरंतर त्यांच्याठायींच सानुराग रते. ५६

''दुर्वासना तयांच्या दर्शनमात्रेंच दूर पळतात;
''त्यांच्या कृपाकटाक्षें अज्ञानाचेहि बंध गळतात. ५७
''तेच खरे मित्र जगीं, नसती त्यांसारखे दुजे आप्त–
''लोभ न धरितां देती लाभ अलभ्यहि करोनियां प्राप्त. ५८
''यास्तव बुधजनदर्शन होतां लववून आदरें मान,
''बोधामृतें भरावे भव्येच्छूंनीं तयांचिया कान. ५९
''वदतां सत्य कधींही न धरावी लाज भीड वा भीति;
''सर्वेहि धर्म जगांतिल एकमतें सांगतात ही नीति. ६०
''लक्षण सद्धर्माचें सच्छास्त्रांचेंहि सत्यची सार;
''व्यवहारनीति सारी सत्यावांचूनि होय निःसार; ६१
''सौभाग्य मति–सतीचें सत्य, गुणांचें शुचिप्रभावरण;
''सत्य मुखाचें मंडण, वाणीचेंही मनोरमाभरण; ६२
''सत्य मनुष्यपणाचें चीज, यशाचेंहि बीज सत्यचि रे;
''जीवन जीवदशेचें, जीवात्म्याचेंहि तेज तेंचि खरें; ६३
''सत्य सुखाचें साधन; सत्यें पुरुषार्थ साधती चारी;
''सत्याविना निरर्थक होती दानें व्रतें तपें सारीं. ६४
''सत्यव्रत हें ह्मणुनी प्राणापेक्षांहि मानुनी थोर
''सोडूं नको नको रे संकटकाळांतही महा घोर. ६५
''माहेर दुर्गतीचें दुष्कीर्तीचेंहि होय दुर्व्यसन;
''यास्तव बळें धरावें तिकडे वळतांच आवरोनि मन. ६६
''दुर्व्यसनें द्रव्याची होय यशाचीहि आपल्या होळी;
''इहपरलोकसुखाची मग कां व्हावी न राखरांगोळी? ६७

“दुर्व्यसनांनीं मेले तितके मेले न शस्त्रधारांनीं,
“दुष्काळांनीं, अथवा ज्वरातिसारादिकां विकारांनीं. ६८
“दुर्व्यसनीं जो रमतो, त्याची होऊनि दुर्दशा काळें
“तोच मरे न, तयाचीं मरती अन्नाविना मुलें बाळें. ६९
“कसला त्यास गृहस्था-श्रम? गृहिणीचेंच होय विस्मरण!
“ ‘सुटतें ह्याच्या हातुनि’—तीहि ह्मणे—‘देव कां न दे मरण’!
“मातापितरें त्याचीं ह्मणती ‘आह्मी करोनियां लाड
“ ‘कष्टें वाढविलें कां असलें हें नष्ट कारटें द्वाड?’ ७१
“नोळखिती आप्त तया येतां पाहोनि लाविती दार;
“त्यजिती मित्र तयास, न घेती त्याचा कधीं समाचार. ७२
“आबालवृद्ध सारे लोक टवाळी करोनियां त्याची
“ह्मणती—‘लाज न वाटे ह्मास कशी तोंड दाखवायाची?’ ७३
“पडली तरी मुलांची जन्मोजन्मीं सुखें पडो वाण—
“येऊं नये कधींही पोटीं असला परंतु पाषाण! ७४
“झाला मनुष्य कां हा? होउनि कां राहिला न हा दगड?—
“पाहुनि चार तयाचे ह्मणति असें बायका मुलें उघड. ७५
“विषयीं विराग तैसा अनुरागहि फारसा न कामाचा;
“हरितो मनुष्यपण तो, नाश करी हाहि मोक्षकामाचा. ७६
“भोगार्ह वस्तु ज्या ज्या भोगाव्या त्या; परंतु भोगाचा
“अतिरेक होय जेथें तेथें संचार होय रोगाचा. ७७
“आहारीं व्यवहारीं मर्यादेवांचुनी नसे गोडी;
“पावे तोच खरें सुख न कधीं नियमितपणास जो सोडी.

"यास्तव नियमनसूत्रें बद्ध मनोवासना बळें करुनी,
"प्रक्षुब्ध त्या न झाल्या तोंच धरावें तयांस आवरुनी. ७९
"योग नको, याग नको, तीर्थ नको वा त्रिदंडसंन्यास,–
"एक विवेक पुरे; त्या आवरती वासना न अन्यास. ८०
"योगी तो न विरागें सोडुनि संसार होय जो जोगी;
"योगी तोच, मनोजय करुनि सदा योग्य भोग जो भोगी.
"वास उपाधिभयानें केला जाऊनि काननीं जेणें,
"पंडितमन्य असो तो, हारविलें परि मनुष्यपण तेणें. ८२
"तोच मनुष्य खरा जो बसवुनियां इंद्रियांवरी पगडा
"सारी प्रपंच करुनी धैर्यानें संकटांसवें झगडा. ८३
"हो वा न हो यशस्वी, होय तयाचाच सुफल संसार;
"जननी धन्य तयाची, तोच कुलाचा खरा अलंकार." ८४

# विजयिनीविजयाष्टक.

ज्युबिली १८८७.



प्रेमें पाळुनियां प्रजा विसरवी जी **रामराज्य**स्मृती,
धर्मन्याय **युधिष्ठिरा**सम घरीं दारीं जिच्या राबती,
केला लोक अशोक शोक हरुनी जीनें **अशोका**परी,
ती राणी **विजया** निरंतर करो साम्राज्य पृथ्वीवरी. १

कष्टें आर्जवितां **शिकंदर** महाराजा न जी भाळली,
**चाणक्यें** दिधले निरर्थक जिला **नंदां** नवांचे बळी,
**बोनापार्ट** जिला भुलोनि पडला कारागृहीं शेवटीं,
नाचे तीच तुझ्यापुढें **विजयिनी** आजी जयश्री नटी! २

अगे! धुंडूं जातां तुजसम दुजी ह्या क्षितितळीं
दिसेना कोठेंही अखिल गुणसंपन्न पुतळी!
तुझ्या जों जों येई ह्मणुनि सुखसिंधूस भरती,
महानंदें तों तों सकलजनचित्तेंहि भरती. ३

कोणीं भूषविला असेल महिलावृंद स्त्रियांनीं पुरा,
माये! भूषविली परंतु सगळी ही त्वांच विश्वंभरा!
वर्षें साठ भरोनियां झरझरां जीं आज गेलीं तयां
आनंदें इतिहासकार सगळे गातील लोकांत या. ४

तुझे गुण न गायिले, गुणवती! कुणीं या जनीं?
तुझा विजय ऐकुनी सुख न कोण पावे मनीं?
अशा तुजसमा महा सुभगशालिनीच्या कथा
कथोनि कवि लाविती जड जनांप्रती सत्पथा. ५

शस्त्रास्त्रांच्या बळानें अगणित नृपती देश जिंकोनि गेले;
रक्तांचे पूर त्यांनीं ह्मणति जलनिधीसारखे वाहवीले;
ऐशा ह्या राक्षसांच्या धुउनि सकलही दुष्कृती टाकणारी
सत्कृत्यें आपल्या ह्या क्षितिवर असशी-त्वत्समा तूंच नारी! ६

विद्या वास घरोघरीं करुनियां अज्ञान सारी दुरी;
नाना चित्रकला विलास करिती स्वच्छंद पृथ्वीवरी;
दासांच्या तुटल्या बिड्या पसरलें स्वातंत्र्य चोहींकडे;
भाग्यें सर्व तुझ्याच–लोक ह्मणती–**व्हिक्टोरिये** हें घडे! ७

देवी! देव तुला चिरायु करुनी ठेवो सुखी सर्वदा!
वाढो वैभव उत्तरोत्तर तुझें ऐसेंच माये सदा!
सत्ता ह्या भुवनीं तुझी पसरुनी निर्वेध चोहींकडे
कीर्तीचेहि तुझ्या झडोत **विजये** भूमंडळीं चौघडे! ८



[ द. प्रै. कमिटीनें बक्षीस दिलेलें काव्य. ]

# अभिनवकादंबरी.

बाणभट्टाच्या 'कादंबरी' चें धुंडिराज कवीनें आर्यावृत्तामध्यें सार काढिलें. त्याचें हें मराठी भाषांतर त्याच वृत्तामध्यें रा. रा. गंगाधर रामचंद्र मोगरे यांनीं केलें आहे. कथानकाच्या एकंदर ३६१ आर्या आहेत; शिवाय 'समर्पण', 'प्रस्तावना' आणि 'मराठी ग्रंथकारांस प्रार्थना' मिळून ५० आर्या आहेत. कमिटीचे **सेक्रेटरी** ह्मणतात—"मूळ संस्कृतांतील गोष्ट प्रस्तुत पुस्तकांत यथातथ उतरली आहे, आणि बाणाच्या कादंबरीची मराठी वाचकांस ओळख करून देण्यास या पुस्तकाचा चांगला उपयोग होईल······या कवितांमध्यें ग्रंथकारानें विलक्षण सौकर्य, सहजता आणि सुगमता आणिलीं आहेत असें आढळून येईल···अशा सुबोध आणि सरळ कविता मराठीमध्यें क्वचित् दृष्टीस पडतात."

रा. ब. **नारायणभाई दांडेकर** लिहितात—"या पुस्तकास भाषांतर ह्मणण्यापेक्षां मूळ पुस्तकच ह्मणणें जास्त शोभेल. काव्यौघ मोठा प्रशंसनीय आहे."

नामदार **म. गो. रानडे** लिहितात—" आर्यावृत्तामध्यें कविता रचण्याची ग्रंथकाराची कुशलता आणि मराठी भाषेवरील त्यांचें प्रभुत्व, हे या पुस्तकांतील विशेष गुण होत."

**डा० भांडारकर** ह्मणतात—"रचना सुबोध, अस्खलित आणि सुंदर असल्यामुळें हें पुस्तक चांगलें झालें आहे यांत बिलकुल संशय नाहीं."

**आवृत्ति दुसरी** किंमत चार आणे ट. ख. अर्धा आणा.

पुस्तकें **विविधज्ञानविस्तार** ऑफिसांत विकत मिळतील.